
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू- प्रवास
सं. क्र. 235




# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास



बाळशंकर देशपांडे

REFBK-0010196



आर्ट कार्नर

# क्रांतिकारकांचें मुगुटमणि

# स्वातंत्र्यवीर सावरकर

**किं. १ रुपया**

REFBK-0010196

**लेखक—बालशंकर देशपांडे**

१०१९

## — अभिप्राय —

**विवेक**—( दि. २३-१२-५६ )

"...वसंतमधील श्री. बालशंकर देशपांडे यांनीं लिहिलेला स्वा. सावरकरां- वरील लेख अप्रतिम आहे. त्यांत सावरकरांचा स्फूर्तिप्रद परिचय तर आहेच, परंतु क्षुद्र मनांनीं सावरकरांवर घेतलेल्या आक्षेपांचें खंडणहि आहे. श्री. देशपांडे यांनीं हा लेख अत्यंत आग्रहानें आणि अभिनिवेशानें लिहिला आहे. परंतु हा अभिनिवेश अनाठायीं नाहीं. एवढ्या मोठ्या पुरुषावर झालेल्या अन्यायाची ती अगदीं स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. प्रत्येकानें वाचलाच पाहिजे असा हा लेख आहे...."

**प्रा. श्री. म. माटे**—( दि -१-१९५७ )

"...अभ्यास, भा [illegible] वेश, निर्णय या सर्व तऱ्हांनीं स्वा. सावरकरांचा परिचय मोठा उद्बोधक व [illegible] ला आहे...."

**श्री. वा. ना. देशपांडे**—( [illegible] १-१०-१९५६ )

"...वसंत दिवाळी अंक आज अकस्मात् पाहण्यास मिळाला. आपला सावरकरांवरील लेख वाचला. लेख उत्तम आहे...त्यांच्या काव्याचा केलेला गौरव यथार्थ आहे. सावरकरांच्या कांहीं कविता मराठीचें अमर लेणें आहे....वर म्हटल्याप्रमाणें लेख खरोखरच उत्तम उतरला आहे. अभिनंदन..."

# मराठीचे मानकरी

( पृ. ६०० : किंमत ८ रुपये )

लेखक—बालशंकर देशपांडे

## — कांहीं अभिप्राय —

श्री. **वि. स. खांडेकर**—( ४-१-५७ )

"...आपले लेख मी वाचले. आपण ते परिश्रमपूर्वक लिहितां एवढी जाणीव वाचकाला निश्चित होते. आपल्या लेखमालेमुळें सर्व सामान्य वाचकांची रसिकतां व चिकित्साबुद्धि जागृत होवो"

प्रा. **चिं. वि. जोशी**—( ३-१-५७ )

"...वसंतमधील तीन परिचय लेख मी वाचले व ते सर्व माझ्या मतानें चांगले वठले आहेत..."

श्री. **पु. भा. भावे**—( ३-१-५७ )

"...प्रा. फडक्यांवरील आपला लेख मोठा वारकाव्याचा व समतोल आहे....स्वा. सावरकरांवरील लेख मला फार आवडला...."

प्रा. **शं. दा. पेंडसे**—( १०-३-५६ )

"...सत्तरीच्या घरांत आलेल्या या थोर मानकऱ्याचें ( प्रा. श्री. म. माटे यांचें ) सर्व वाङ्मय आत्मसात करून त्याचें सुंदर शैलीनें सहानुभूतिपूर्ण रसग्रहण व मूल्यमापन करणारा आणि प्रा. बापूसाहेब माटे यांच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारा श्री. बालशंकर देशपांडे यांचा लेख मला अत्यंत आवडला. ग्रंथकाराच्या हृदयांत शिरून, त्यांच्या वृत्तीशीं समरस होऊन, अभ्यासपूर्वक लिहिलेला आणि सुरेख शैलीनें नटलेला इतका सर्वांग सुंदर लेख मी पुष्कळ दिवसांत वाचला नव्हता. श्री. देशपांडे यांना माझें अभिनंदन कळवावें..."

# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास

ग्रंथ संग्रहालय, [illegible]
अनुक्रम [illegible] वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

: लेखक :

बालशंकर देशपांडे

किंमत १ रुपया

: प्रकाशक :

पंडित बखले,
अखंड हिंदुस्थान प्रकाशन,
विठ्ठलवाडी, रानडे पथ,
दादर, मुंबई २८.

: प्रकाशन :

१५ मे १९५८

सर्व हक्क सौ. पद्मावती देशपांडे ( उमरखेडकर ) यांच्या स्वाधीन

: मुद्रक :

स. पां. जोशी,
रामदास मुद्रणालय,
शिवाजी पार्क,
दादर, मुंबई २८.

चि. कु. शालिनी

व

चि. दिलीप

या माझ्या

लाडक्या अपत्यांस—

# बालशंकर देशपांडे यांचें वाङ्मय

## — प्रकाशित —

१ श्रावणांतल्या विजा [ कथासंग्रह ]

२ यमुनाजळीं [ कथा व लघुनिबंध ]—दु. आवृत्ति
[ आग्रा विद्यापीठानें B. A. च्या अभ्यासक्रमांत समाविष्ट केलेला. ]

३ माझं जग [ स्व. सा. कादंबरी ] शिल्लक नाहीं

४ शोभेचे सौभाग्य [ल. कथा व ल. निबंध] शिल्लक नाहीं.

५ शिव्या आणि ओव्या [ ललित निबंध.]

६ तांडव आणि लास्य [ल. कथा व लघुनिबंध] शिल्लक नाहीं.

७ वऱ्हाडी कणसें [ ल. निबंध ]

८ रसरंग [ कवितासंग्रह ]

९ विद्यार्थी मित्रहो [ निबंध व परीक्षणें ]

१० क्रांतिकारकांचे मुकुटमणि स्वा. वीर सावरकर
[ व्यक्ति व वाङ्मय ]

११ माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास

## — आगामी —

१ मराठीचे मानकरी [ टीका ]

२ लेखनकलेचा अभ्यास [ प्रबंध ]

३ अति झालं हसूं आलं [ ल. निबंध ]

४ तुका म्हणे ऐशा नरा ! [ नाटक ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23662 दि: ...
क्रमांक ...शब्द ...236 नों. दि ...

भारतांत दरवर्षी कोणत्या ना कोणत्या तरी प्रसिद्ध शहरीं अखिल भारतीय शिक्षणपरिषदेचें अधिवेशन भरविण्यांत येत असतें. शिक्षणक्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ति एकत्र येऊन त्यांनीं आपल्या व्यवसायासंबंधीं, त्यांतील अडीअडचणीविषयीं विचारविनिमय करावा हा जसा अधिवेशन भरविण्यांत एक हेतु आहे तसाच, त्या निमित्तानं शिक्षकांना प्रवासाची संधि मिळून निरनिराळीं इतिहासप्रसिद्ध व निसर्गरम्य ठिकाणं त्यांच्या पाहण्यांत यावीं हा दुसरा महत्वाचा हेतु याच्या मुळाशीं आहे.

शिक्षणपरिषदेच्या या उद्दिष्टाचा बहुसंख्य शिक्षकांना फायदा घेतां यावा म्हणून आमच्या जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट ( दादर ) या संस्थेनें परिषदेसाठीं जाऊं इच्छिणाऱ्या शिक्षकांना रेल्वेभाडें व इतर सवलती देण्याचें उदार धोरण ठेवलें आहे.

यामुळेंच गेलीं पांचसहा वर्षं माझ्यासारख्या मध्यम स्थितींतल्या शिक्षकाला प्रवासाचा फायदा पदरांत पाडून घेतां आला. गेल्या तीन वर्षांत पाटणा, दिल्ली व जयपूर येथें भरलेल्या शिक्षण परिषदेच्या निमित्तानं नालंदा, राजगीर, प्रयाग, काशी, सारनाथ, आग्रा, फत्तेपूर शिक्री, अबूचा पहाड, दिलवाडा, अजमेर, पुष्कर, अहमदाबाद, बडोदा वगैरे अनेक स्थळं माझ्या पाहण्यांत आलीं. त्यांतील कांहीं ऐतिहासिक दृष्ट्या, तर कांहीं धार्मिक दृष्ट्या, कांहीं निसर्गरम्य म्हणून तर कांहीं सांस्कृतिक दृष्ट्या महत्व पावलेलीं आहेत. या सर्व स्थळांचं वर्णन करतांना मला प्रत्यक्षानुभवाचं जसं सहाय्य झालं तसंच अधिकारी लेखकांचं त्या त्या स्थळासंबंधीचं विवेचनहि उपयोगी पडलं. तथापि स्थलमर्यादेमुळं कांहीं ठिकाणांचीं वर्णनं अगदींच धावतीं व त्रोटक झालीं याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

१९५७ चें अधिवेशन सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व भारतसरकारचे माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं मद्रासला भरलं होतं. त्या अधिवेशनानिमित्त झालेल्या प्रवासांत म्हैसुर, बंगलोर, शिवसमुद्रम्, पक्षीतीर्थम्, महाबलिपुरम् वगैरे अनेक प्रेक्षणीय स्थळें पाहण्याची मला सुसंधि मिळाली. त्या प्रवासाचा वृत्तांतही मला या पुस्तकांत समाविष्ट करतां आला असता पण पुढील वर्षी शिक्षण परिषदेचें अधिवेशन त्रिवेंद्रम येथें भरण्याचें निश्चित झालें आहे. त्यावेळीं मदुरा, त्रिचनापली व रामेश्वर इत्यादि स्थळांना भेट देण्याचा माझा मानस आहे. त्या अधिवेशनास जाऊन आल्या नंतर दक्षिण हिंदुस्थानच्या प्रवासाचं वर्णन दुसऱ्या स्वतंत्र भागांत प्रसिद्ध करणं मला अधिक उचित वाटतं.

प्रस्तुत प्रवासवर्णन प्रथम 'अभ्युदय' त्रैमासिकांत क्रमशः प्रसिद्ध केल्या-बद्दल व लेखनाच्या बाबतींत मला वेळोवेळीं प्रोत्साहन दिल्याबद्दल छबिलदास बॉईज हायस्कूलचे प्रमुखाध्यापक श्री. नानासाहेब अक्षीकर, व मुख्याध्यापक श्री. वि. म. धामणकर या उभयतांचा मी ऋणी आहे.

तसंच दरवेळीं ज्यांच्या सहवासामुळं प्रवासांतला आनंद दुणावला व अडीअडचणी सुसह्य झाल्या ते व्यवसाय बंधू श्री. मु. दा. बर्वे, श्री. मो. अ. उपाध्ये, श्री. गो. प. किरागे, श्री. आगाशे व इतर अनेक सुहृद या सर्वांचा साभार नामनिर्देश करणं माझं कर्तव्य आहे.

हें प्रवास वर्णन वाचून माझ्या असंख्य वाचक मित्रांनाहि भारतांतील संस्मरणीय नि प्रेक्षणीय स्थळांच्या दर्शनाची प्रेरणा लाभो हीच जगन्नियंत्याजवळ प्रार्थना आहे.

२, राजगुरु निवास,
पाईप लेन, वाकोला,
सांताक्रुझ, मुंबई २५.

**बालशंकर देशपांडे**
२५ एप्रिल, १९५८.

# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास

अखिल भारतीय शिक्षणपरिषदेच्या पंचविसाव्या अधिवेशनानिमित्त १९५० मध्यें द. हैदराबादेस जाण्याची मला संधि मिळाली होती. त्यानंतर मुंबई, नागपूर व कलकत्ता येथें अधिवेशनें भरलीं. पण कांहीं अपरिहार्य कारणामुळें मी नागपूर व कलकत्ता येथें जाऊं शकलों नाहीं. सदरहू परिषदेचें २९ वें अधिवेशन पाटण्यास भरणार असल्याचें जाहीर झाल्यावर मात्र, कितीहि अडचणी आल्या तरी बिहारसारख्या इतिहासप्रसिद्ध भूमीचं दर्शन घेण्याची संधि दवडायची नाहीं, असा मी मनाशीं निश्चय केला आणि प्रस्थानाच्या क्षणाची उत्कंठेनं वाट पाहूं लागलों.

दि. २४ डिसेंबर रोजीं रात्रीं साडेआठच्या कलकत्ता मेलनें मी मुंबई सोडली. आमच्या शाळेंतील नऊदहा शिक्षकांनीं एकदोन दिवस आधींच पाटण्याकडे प्रयाण केलें असल्यामुळें मुंबई ते पाटण्यापर्यंतचा हजारबाराशें मैलांचा प्रवास आतां आपणाला अपरिचित मुशाफिरांच्या सोबतीनेंच करावा लागणार या कल्पनेनें मी कांहींशा खिन्नपणानेंच डब्यांत प्रवेश केला.

नाताळची सुटी सुरू झाली असल्यामुळें सरता महिना असूनहि गाडीला बरीच गर्दी होती. प्रवासाच्या सवलतीचा अर्ज रेल्वेअधिकाऱ्यांकडून ऐन निघण्याच्या दिवशीं मंजूर होऊन माझ्या हातीं पडला होता. त्यामुळें मला जागेचें रिझर्व्हेशन करतां आलें नव्हतें. सरंजामशाहीच्या जमान्यांत वडिलोपार्जित मिळकतीचा वारसा न मिळालेल्या कफल्लक मनुष्याची जी अनुकंपनीय अवस्था व्हावी तिचा मी आतां अनुभव घेत होतों. ज्या डब्यांत शिरावं त्या डब्यांतला प्रत्येक प्रवासी मोठ्या तोऱ्यानं जागेविषयींच्या आपल्या मालकी हक्काची जाणीव करून देऊं लागला. अखेर, राखीव जागा नसलेल्या एका लहानशा डब्यांत मीं कसा-बसा प्रवेश मिळविला. त्या डब्यांतलीं चारी बाकें सात आठ भैयांनीं अडवून ठेवलीं होतीं. नऊ चुली अडविणाऱ्या आठ भैयांची बुद्धिमत्ता व्यवहारशून्यतेची ग्वाही देत असली तरी चार बाकं व्यापून बसणाऱ्या सात भैयांची अक्कल मात्र त्यांच्या फाजील व्यवहारपटुतेची साक्ष पटवीत होती ! बांकाच्या टोंकावर जेमतेम बसण्या-पुरती जागा मागण्याचें माझ्या मनांत आलें. पण बांका-च्याच काय, सुईच्या टोंकावर राहील इतकीहि जागा न देणारी ‘जरी पुराणी’ स्वार्थांधता प्रत्येकाच्या चर्येवर व्यक्त झालेलीं मला दिसत होती. अकलेपेक्षांहि म्हैस मोठी मानणाऱ्या भैयांत मानवता जागी करण्याचा प्रयत्न करणें

म्हणजे, " भैयापुढें नाचल्या पऱ्या, तबेल्यांतल्या म्हशी होत्या बऱ्या!" अशापैकींच प्रकार होणार होता!

याप्रमाणें मी जागेच्या फिकीरींत असतांच, "आयिये बाबूजी! यहाँ जगह कर लीजिये!" असें मला उद्देशून एकजण म्हणत असल्याचें माझ्या लक्षांत आलें!

मोगलसराई स्टेशनवर—



अखिल भारतीय शिक्षणपरिषदेहून
मुंबईस परततांना
श्री. देशपांडे, श्री. साठे, श्री. बापट.

कल्पनेला पंखांची उपमा देण्यांत येत असते. पण ते पंख गरुडाचेच असतात असें नाहीं. निरपराध मणसाच्या कांनांशीं गुणगुणून त्याला सतावून सोडणाऱ्या चिलटांचे सुद्धां........एकंदर उत्तर हिंदुस्थानी लोकांच्या वागणुकीविषयीं मीं मनाशीं केलेली मीमांसाहि अशीच खोडसाळ स्वरूपाची नव्हती का ?

मला अगत्यानं जागा करून देणाऱ्या त्या भय्यानं मोठ्या आदबीन विचारलं, "कहाँ जा रहे हो बाबूजी आप ?"

"पाटणा !"

"पटना ? ठीक ! ठीक ! तो हमारे मुलुख चल रहे आप ! हम भी तो उधरहि चल रहे हैं ! पहले कभी गये थे उधर ?........नहीं ? तो बाबूजी, फिर जरूर देखिये ! बहुत सुंदर देस है ! आपसे क्या कहूँ ?........"

गाडी सुटतांना होणारी लोकांची विशेष धांदल, डब्यांचीं दारं लावलीं जात असतांना होणारे आवाज, उतारूंनीं लवकर पैसे चुकते करावे म्हणून खिडकींत हात घालून गाडीबरोबर धावतांना हमालांनीं अन् खाद्यपेयं विकणारांनीं चालविलेली घाई—

या साऱ्या गोंधळांत त्या भय्याचे पुढचे शब्द मला नीटसे ऐकूं आले नाहींत. त्यानं सुरूं केलेलं आपल्या मुलखाचं वर्णन त्या कोलाहलांत कुठल्याकुठं विरून गेलं !

पण लहानपणापासून मी वाचीत आलेलों गंगामाईच्या कांठच्या सुपीक, समृद्ध, प्रदेशाचीं काव्यमय वर्णनं रंगरूप धारण करून माझ्या मनःचक्षूंसमोर तरळूं लागलीं. भव्योदात्त प्रकृतीच्या वरदानानं सुंदर नि संपन्न बनलेल्या त्या प्रदेशाचा एकेक खंड दृष्टीसमोरून धावूं लागला. गंडक, कमला, लखनदेई इत्यादि सरित्प्रवाहांनीं सिंचित झालेला मिथिलाप्रांत, गंगा, शोणभद्र, फल्गु या नद्यांनीं पूनित झालेला मगध, प्रचंड जलप्रपातांनीं व्यापलेला चिमूरचा पहाडी प्रदेश....हीं सारीं दृश्यं क्रमाक्रमानं दृष्टीपुढून जातांना माझ्या सर्वांगांवर अननुभूत आनंदाचे रोमांच उभे राहिले. आणि उत्तर भारताला भूगोलाइतकाच, किंबहुना कांहींसा अधिकच, लाभलेला रोमहर्षक इतिहास आठवतांना, त्यांतलं एकेक पान दृष्टीपुढून उलटलं जात असतांना माझ्या साऱ्या वृत्ति मोहरून गेल्या!

रामायण, महाभारतादि प्राचीन ग्रंथांतूनहि ज्या विदेह, लिच्छवी, अंग आणि मगध साम्राज्याचा उल्लेख आला आहे, त्यांच्या उत्कर्षापकर्षाला साक्षी असलेल्या बिहारचं आपणाला प्रत्यक्ष दर्शन घडणार हीं कल्पनाच माझ्या मनाला मोठी विलोभनीय वाटत होती. चक्रवर्ती बृहद्रथ, जरासंध, यांच्यासारख्या विक्रमशाली सम्राटांचा पराक्रम ज्या भूमीनं अवलोकन केला, बिंबिसार, अजातशत्रु यांच्यासारख्या बलाढ्य नृपवरांचा राज्यकारभार जिनं पाहिला,

नंद, मौर्य, शुंग, कण्व, गुप्त आणि पाल या घराण्याचा उदयास्त जिच्या डोळ्यांदेखत घडला व भगवान्‌बुद्ध, महावीर, गुरुगोविंदसिंह यांच्यासारख्या नररत्नांना जिनं जन्म दिला, त्या मगध भूमीच्या दर्शनाचा दिव्य क्षण अगदीं समीप येऊन ठेपल्यावर कोणाचं मन उन्मन होणार नाहीं ?

गाडीपेक्षांहि वेगानं भूतकाळांत भ्रमण करणारं माझं मन वर्तमानांत परत आलं तें हवेंतील वाढत्या गारठ्याच्या जाणीवेनं! आमच्या गाडीनं कल्याण स्टेशन केव्हांच मागं टाकून कसाऱ्याच्या घाटाची चढण चढायला आरंभ केला होता. क्रीडांगणावरला एकेक खेळाडू हळूं हळूं बाद व्हावा त्याप्रमाणं गप्पागोष्टींत गढलेल्या प्रवाशांपैकीं एकेकजण निद्राधीन होऊं लागला. मध्यरात्र उलटल्यावर माझ्याहि वृत्ति सुस्तावूं लागल्या आणि बसल्या बसल्याच खिडकीच्या कांचेवर रेलून मीं डोळे मिटून घेतले.

गायकानं द्रुतलयींत चीज आळवावी त्याप्रमाणं कमालीच्या वेगानं स्टेशनांमागं स्टेशनं टाकीत आमची गाडी धावत होती. एखाद्या लहानशा स्टेशनवर सांधा बदलल्यामुळं गाडीच्या लयींत किंचित् फरक पडलासा वाटे पण ती त्या स्टेशनवर न थांबतां तशीच पुढें निघाली म्हणजे गायकानं समेच्या ठिकाणीं मुद्दामच दिलेल्या हुलकावणीची आठवण होई.

अनुक्रम क्रमांक नों दि

मनमाड स्टेशन गेल्यावर मीहि झोंपेच्या पूर्णपणें स्वाधीन झालों. एखाद्या मोठ्या स्टेशनवर गाडी उभी राहिली म्हणजे प्लॅटफॉर्मवरील उतारूंच्या गडबडीमुळं झोंपेंत जो काय थोडासा व्यत्यय येई तेवढाच!

सकाळीं साडेसहाच्या सुमारास खंडवा स्टेशनवर चहा घेतल्यावर मला थोडा उत्साह वाटला. पूर्वी न पाहिलेल्या प्रदेशांतून आतां मी प्रवास करीत होतों. अपरिचित भागांतून प्रवास करतांना मोठ्या उत्कंठेनं खिडकीबाहेर डोकावून आजूबाजूच्या प्रदेशाचं निरीक्षण करण्याचा मला षौक आहे. तसं पाहिलं तर ज्या भागांतून आतां आमची गाडी जात होती तो कांहीं फारसा मनोवेधक नव्हता. त्यांत कुठंहि वैचित्र्य किंवा भव्यता यांचा आढळ होत नव्हता.

जबलपूर स्टेशन मागं पडल्यावर लोकांचा पोषाख, भाषा इत्यादि बाबतींतलीं भिन्नता ठळकपणें जाणवूं लागली. दिवस कलूं लागला तसतसा हवेंत गारठा येऊं लागला. रात्रीं दहाच्या सुमारास अलाहाबादला गाडी पोंचली तेव्हां थंडी मी म्हणत होती! "कुठल्याशा थंड प्रदेशांत माणसांच्या शब्दांचंहि गोठून बर्फ बनतं व मग ते तव्यावर परतून त्यांचा अर्थ समजावून घ्यावा लागतो," हा कुठंतरी पूर्वी वाचलेला विनोद मला अतिशयोक्तिपूर्ण

वाटला होता. पण अलाहबादच्या स्टेशनवर उतरतांच तो स्वभावोक्तींवर आधारला असल्याची खात्री पटूं लागली!!

स्टेशनबाहेर पडतांच दहापंधरा रिक्षावाले माझ्या भोंवतीं गोळा झाले आणि, "किधर जाना है बाबूजी?" "रिक्षा चाहिये बाबूजी?" वगैरे प्रश्नांचा भडिमार करूं लागले!

आकस्मिकपणें अंगावर मधमाशांचं मोहोळ तुटून पडल्यावर एखाद्याची जी अवस्था होत असेल ती मी अनुभवीत होतों! पण थोड्याच वेळांत मला कळून चुकलं—त्या मधमाशा नव्हत्या! आणा दोन आण्यांच्या यत्किंचित् लाभासाठीं दिसेल त्या 'सवारीं' भोंवतीं आशाळभूतपणानं घोंगावणाऱ्या साध्या माशा होत्या त्या!

अन् तिथल्या एक दीड दिवसाच्या मुक्कामांत मला त्या रिक्षावाल्यांच्या आशाळभूतपणाची अन् दैन्याची विशेष तीव्रपणानं जाणीव झाली! दीडदोन आण्यांच्या प्राप्तीवर दोन दोन तीन तीन मैल रिक्षा चालवणाऱ्या, उरीं फुटेस्तोंवर कष्ट करून दिवसाच्या कांठीं रुपया सव्वा रुपयांची कमाई करणाऱ्या त्या अभागी जिवांची धडपड ——धडपड कसली? भुकेनं कासावीस झालेल्या प्राण्यांची केवीलवाणी तडफडच म्हणायची ती!—पाहतांना कमालीचं दुःख होई मला! पण अश्रूंनीं वणवा विझत नसतो. त्याला वरुणास्त्राचाच प्रयोग व्हावयास हवा!

रिक्षावालेच काय, पण हमाल, मजूर, किसान या साऱ्याच श्रमजीवींना खडतर दारिद्र्याचा दुःखास सहन करावा लागत आहे असं तिथल्या मुक्कामांत मला आढळून-आलं !

त्रिवेणीसंगमावर स्नान करतांना, पंडित नेहरूंचं निवासस्थान पाहतांना, फार काय, शहरांत मिळणारी स्वस्त मिठाई व पेरू खातांनाहि तिथल्या कंगाल, निर्धन परिस्थितीचं भेसूर चित्र माझ्या डोळ्यांसमोर तरळूं लागे ! भिकारणीच्या कंठांतून शृंगारिक लावणीची अगर हास्यरसपूर्ण गाण्याची उपज झाली तरी त्यांत एकप्रकारची कारुण्याची विचित्र छटा मिसळलेली प्रतित व्हावी तशी आनंदाच्या, आस्वादाच्या अनुभूतींतहि सूक्ष्म व्यथा दडली असल्याची जाणीव होई !

पण येवढं एक शल्य सोडलं तर प्रयागराजाच्या परिसरांत माझ्या मनाला शुद्ध, निरामय आनंदाची प्रचीति आणून देणाऱ्या कितीतरी गोष्टी आढळून आल्या.

कुठल्याहि भागांतून जातांना, आपल्या घरांत तंबोरा छेडीत संगीताचा रियाज करीत बसलेल्या एखाद्या गायकाच्या कंठांतले सुरेल स्वर कानावर येत आणि मग उत्तर हिंदुस्थानांत आपण आलों असल्याची सुखद जाणीव होई. गायकीचे अनेक प्रकार, अनेक ढंग पिढ्यान्‌पिढ्या परिश्रमपूर्वक जतन करून ठेवणारीं कितीतरी घराणीं अलाहाबादेंत

असल्याचं मी वाचलं—ऐकलं होतं ! त्याचं रस्त्यारस्त्यांतून हिंडतांना मला प्रत्यंतर येत होतं !

संगीताप्रमाणंच उत्तर हिंदुस्थानी लोकांच्या जीवनांतला दुसरा एक ठळक विशेष माझ्या लक्षांत आला तो त्यांच्या सुगंधप्रियतेविषयींचा. संगीताप्रमाणंच—किंबहुना थोडं अधिकच—इकडच्या लोकांना सुगंधाचं आकर्षण असल्याचं दिसून आलं. पुण्यामुंबईकडे नाक्यानाक्यावर पानपट्टीचीं दुकानं थाटलेली असतात, तशी इकडे अत्तराची दुकानं आढळून येतात. एखाद्या सुगंध्याच्या दुकानावरून जातांना विविध प्रकारच्या पुष्पार्कांचा मत्त, संमिश्र दरवळ घ्राणेंद्रियाला सुखवूं लागला म्हणजे संगीताचं सुगंधांत रूपांतर करणारा एखादा किमयागार तर या नगरींत वसत नसावा ना अशी विलक्षण शंका मनाला स्पर्श करून जाई !

गुलाबपाण्याच्या शिडकाव्यानं सुगंधित बनलेल्या नि गुलाबाच्या पाकळ्यांखालीं झांकलेल्या चमचम, संदेश, गुलाबजामून इत्यादि प्रकारच्या मिठायांचा आस्वाद घेतांना, ज्ञानेश्वरांचा " इंद्रियां लागे कळंभा " हा उद्‌गार मला निराळ्याच अभिप्रायानं अर्थपूर्ण वाटूं लागे ! ओंवीच्या घाटणीच्या सौंदर्यावर हक्क प्रस्थापित करूं पाहणाऱ्या, 'रसाळपणाचिया लोभानं' आपसांत भांडणाऱ्या निरनिराळ्या इंद्रियांविषयीं ज्ञानदेवांनीं तो उद्‌गार काढला होता. सुवास,

सौंदर्य अन् रुचि या तिन्ही गुणांनीं परिपूर्ण असलेल्या मिठायाहि नाक, डोळे, जिव्हा इत्यादि इंद्रियांच्या कलहाचा विषय व्हावा यांत नवल नव्हतं !

अलाहाबाद शहराची रचना फारशी सुडौल नसली तरी अगदींच अव्यवस्थितहि नाहीं. दारागंज, कटरा इत्यादि कांहीं भाग सोडले तर नव्या वसाहतींत रुंद रस्ते, टुमदार इमारती, प्रशस्त बागा वगैरे आधुनिकतेच्या सर्व खाणाखुणा दृष्टोत्पत्तीस येतात.

नेहरूंचं स्वराज्यभवन व आनंदभवन, खुश्रूबाग, नवं हायकोर्ट, हनुमान मंदिर, किल्ला हीं शहराचीं प्रमुख आकर्षणं म्हणून सांगतां येतील.

आनंदभवन व स्वराज्यभवन या इमारती पाहत असतांना पितापुत्र नेहरूंचा जीवनपट व त्याच्या अनुषंगानं हिंदुस्थानच्या राजकीय घडामोडींचा इतिहास डोळ्यांपुढून सरकूं लागला आणि तो पाहतांना आनंद, विषाद, औदासिन्य इत्यादि संमिश्र भावनांची मनांत एकच गर्दी झाली.

मोतीलाल नेहरूसमवेत राजकीय पुढाऱ्यांनीं केलेल्या वाटाघाटी अन् मसलती याच वास्तूच्या परिसरांतील कणाकणानं ऐकल्या असतील, सायमन कमिशनच्या निषेधाच्या प्रसंगीं लखनौ इथं उद्दाम ब्रिटिश सोल्जरांनीं जवाहरलालजींच्या अंगावर अमानुषपणें घोडे घातल्याची

वार्ता ऐकून याच इमारतीच्या प्रांगणांतील लतावृक्ष भयमिश्रित हर्षानं थरारले असतील, कमलादेवींची असीम, निरागस सौंदर्यसंपदा पाहून याच निवासस्थानाच्या पुष्करिणींतली कमळं स्तिमित झालीं असतील..........


त्या आनंदभवनाच्या वातवरणांत आतां सगळीकडे उदास नीरवता पसरली होती. भारावलेल्या अंतःकरणानं त्या स्थलाचा निरोप घेऊन मीं आमच्या रिक्षावाल्याला संगमाकडे चलण्यास सांगितलं. हवेंत कमालीचा गारठा असल्यामुळं मीं मुद्दामच स्नानाचा कार्यक्रम दुपारीं उरकून घेण्याचं ठरविलं होतं.

शहराबाहेर संगमाच्या रोखानं वाहनं जाऊं लागलीं म्हणजे त्यांतल्या यात्रेकरूंभोंवतीं गराडा घालून आपल्या-बरोबर चालण्याचा पंड्ये आग्रह करूं लागतात. त्यांची ती लोंचट, स्वाभिमानशून्य याचनावृत्ति पाहिली म्हणजे, 'पुण्य नको पण पंड्ये आवर' अशी गंगामाईस हात-जोडून प्रार्थना करावीशी वाटते.

संगमाजवळ मोक्षाच्या बाजारपेठेंतल्या या दलालांचे तळच्या तळ पडलेले आढळून आले! एकीकडे त्रिवेणीसंगमाचं चित्ताकर्षक, उदात्त दृश्य आणि त्याच्याच शेजारीं पंड्यांच्या लोभी, स्वार्थपरायण, भोंदु मनोवृत्तीचं हिडीस, घृणास्पद चित्र पाहतांना मन उद्विग्न झाल्यावांचून राहत नाहीं.!




दशाश्वमेध घाट–काशी.



त्रिवेणीसंगम–प्रयाग.




आनंदभवन-अळाहाबाद.



खुश्रुबाग-अलाहाबाद.

अंतर्यामांत डांचणारं हें शल्य महत्प्रयासानं विसरून मीं संगमाचा अपूर्व, अलौकिक देखावा अनिमिष लोचनांनी पाहूं लागलों ! दोन सरित्प्रवाहांच्या मीलनाचं केवढं मंगल, किती सुंदर दृश्य होतं तें ! मीलनानंतरहि बऱ्यांच अंतरापर्यंत दृग्गोचर होणारी यमुनेची काळसर सीमारेषा पाहतांना वेदांतांतील विशिष्टाद्वैताची कल्पना साकार झाल्याचा मधुर आभास मनाला होत होता !

या आभासापाठोपाठ मोरोपंत, ज्ञानेश्वर, कालिदास इत्यादि कविश्रेष्ठांच्या काव्यांतले संगमासंबंधींचे संदर्भ आठवून मन पुलकित झालं !



पदार्थसंग्रहालय—पाटणा.

" श्रीकृष्णमूर्ति यमुना, गंगे ! श्रीशंभुमूर्ति तूं धवला
ब्रह्मसुखाच्या देतां, द्रवुनि तुम्ही, माय मावशी कवळा "
अशी मोरोपंतांनीं एके ठिकाणीं समर्पक उत्प्रेक्षा योजली होती. विश्वरूपदर्शनाच्या अध्यायांतील शांत आणि अद्भुत रसांच्या मिळणीचं वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनीं—

" मीनले गंगायमुनेचे ओघ । तैसें जाहलें प्रयाग,
म्हणोनि सुस्नात होत जग । आवघें येथ ॥ "
माजी गीतासरस्वती गुप्त । आणि दोन्ही रस ते ओघमूर्त
यालागीं त्रिवेणी हे उचित । फावली बापा ! "

हें भव्य नि अर्थपूर्ण रूपक रचलं होतं ! कालिदासाचा यक्ष मेघाला प्रवासाचा मार्ग कथन करतांना—

" तस्याः पातुं सुरगज इव व्योम्नि पश्चार्धलम्बी
त्वं चेदच्छस्फटिकविशदं तर्कयेस्तिर्यगम्भः ।
संसर्पन्त्या सपदि भवतः स्रोतसि च्छाययासौ
स्यादस्थानोपगतयमुनासङ्गमेवाभिरामा ॥

अशी मार्मिक शंका बोलून दाखवितो तीहि याच मनोहर दृश्याच्या अनुरोधानं !

अनेक कवींच्या प्रतिभेला स्फूर्ति देणारा गंगायमुनेच्या संगमाचा तो चेतोहर देखावा मी तसाच अवाक्, निश्चल वृत्तीनं किती वेळ पाहत राहिलों असतों कुणास ठाऊक ? पण अजून कांहीं स्थळं पहावयाचीं उरलीं असल्यामुळं मी

मोठ्या कष्टानं तीर्थराजाचं विराट, स्निग्धगंभीर स्वरूप नेत्रसंपुटांत साठवायचा यत्न करीत शहराकडे वळलों.

यावेळीं रिक्षाऐवजीं 'टमटम' या खास उत्तर हिंदुस्थानी वाहनांतून शहरांत फेरफटका मारायचं मीं ठरविलं होतं! टांग्याप्रमाणंच, पण वर छत नसलेल्या आणि प्रशस्तपणें मांडी घालून बसतां येईल अशी सपाट बैठक असलेल्या या वाहनांतून फिरतांना वेगळीच मौज वाटते.

टमटममध्यें ऐसपैसपणें बसून गप्पा छाटीत व हुक्का पीत शहरांतून फिरण्याचा नगरवासीयांचा आवडता छंद दिसतो.

अलाहाबाद युनिव्हर्सिटी, नवें हायकोर्ट खुश्रूबाग वगैरे ठिकाणें पाहिल्यानंतर मी त्याच दिवशीं संध्याकाळच्या गाडीनं बनारसकडे प्रयाण केले.

अलाहाबादप्रमाणंच बनारसलाहि रिक्षांचा सुळसुळाट असून अगदीं स्वस्त दरांत त्या मिळूं शकतात. इथले रस्ते व एकंदरींत शहराची रचना मात्र अलाहाबादच्या मानानं यथातथाच वाटली. प्रथमच काशीस येणाऱ्या मनुष्याला तिथले निरुंद रस्ते, वेडेवाकडे बोळ आणि जुनाट मोडकळीस आलेल्या इमारती पाहून त्या शहराविषयीं उबगच वाटूं लागतो. कुठल्याहि भागावर आधुनिक नगररचनेचे पुसट संस्कारहि उमटल्याचं दृष्टोत्पत्तीस येऊं नये याचं कमालीचं आश्चर्य वाटलं मला!

शतकानुशतकं आर्यसंस्कृतींचं केंद्र, प्राच्य विद्यांचं माहेरघर म्हणून समजल्या गेलेल्या या नगरीवर वास्तुकलेचा अनुग्रह झाल्याची एकहि खूण दिसून येऊं नये, स्थापत्याचा वरदहस्त असल्याची एकहि साक्ष मिळूं नये हें नवलच नाहीं कां ?

मला सर्वांत आश्चर्याचा धक्का बसला तो विश्वनाथाच्या मंदिरांत गेल्यावर ! जागृत देवस्थान म्हणून आजवर ज्याची कीर्ति मी ऐकत आलों होतो, ज्याच्या दर्शनावांचून जीवितसाफल्य नाहीं, अशी लाखों, करोडों भाविकजन मनोमय श्रद्धा बाळगीत आले होते, त्याचं प्रत्यक्षांतलं स्वरूप पाहतांना डोळ्यांवर विश्वास बसेना माझा ! ईश्वरी अस्तित्वाची वा स्वरूपाची ओळख पटावी अशी एकहि खूण, एकहि लक्षण तिथं दिसून येत नव्हतं ! भव्यता, सौंदर्य, पावित्र्य, शांति यांपैकीं कशाचाच तिथं आढळ होत नव्हता.

देवदर्शनासाठीं सभामंडपांत यात्रेकरूंची झुंबड उडाली आहे, रेटारेटी, खेंचाखेंची सुरू आहे, लहान मुलं चेंगरलीं जाऊन असहायपणें रडत आहेत, ओरडत आहेत, देवास वाहण्यासाठीं आणलेलीं फुलं धक्काबुक्कीमुळं पायदळीं पडून तुडवलीं जात आहेत, गाभाऱ्याजवळ उभा असलेला पुजारी एका हातानं दर्शनेच्छूंच्या हातचीं फुलं, फळं इत्यादि

हिसकावून घेऊन कोपऱ्यांत भिरकावून देत आहे व दुसरा हात त्यांच्यावर उगारून वेगळ्याच अर्थानं रुद्रावताराचा साक्षात्कार घडवीत आहे........

हें दृश्य मनुष्यास दिव्यत्वाची प्रचीति कुठून देऊं शकणार ? 'भाव तिथं देव' असं आपण म्हणतों खरं, पण मग त्यासाठीं शेंकडों, हजारों मैलांचा प्रदेश तुडवून इतक्या दूरवर कशाला यायला हवं ? जडाविषयींचा व्यामोह नष्ट होऊन ज्याला हृदयस्थ ईश्वराची चाहूल घेतां येते अशा मुक्त कोटींतल्या जिवांना देऊळ काय नि चाळ काय, दोन्ही सारखींच ! पण स्थलकालाची जाणीव शिल्लक असलेल्या माझ्यासारख्या बहुसंख्य मुमुक्षूंच्या मनांत परमात्म्याच्या अस्तित्वाची प्रेरणा उत्पन्न करायला विशाल मंदिर अन् तिथल्या महन्मंगल मूर्तींच समर्थ नाहींत का ?

भक्तांच्या श्रद्धेचं रुपये आण्यांनीं मोल करून देवस्थानांना बाजाराची अवकळा आणणाऱ्या, शांति, शुचिता, दिव्यत्व इत्यादि जीवनमूल्यं खुशाल पायाखालीं तुडवून संसारी जनांच्या भावुक वृत्तीला धक्का देणाऱ्या त्या मंदिराच्या विश्वस्ताविषयींचे—विश्वस्त कसले ! विश्वासघातकीच म्हणा-वयाचे ते ! —विचार माझ्या मनाला विद्ध करून सोडीत होते !

१०९८६

तशा खिन्न मनःस्थितींतच मी मंदिराबाहेर पडलों नि जवळच असलेल्या दशाश्वमेधघाटावर गेलों. घाटावरलं दृश्य मात्र देहभान हरपविण्याइतकं नितांत रमणीय वाटलं मला!

दृष्टीची झेंप पोंहोचेल इतक्या दूरवर घाटांची एकच एक रांग पसरलेली आहे. प्रत्येक घाट जनसंमर्दानं गजबजून गेला होता.

गंगेच्या नितळ, दुग्धधवल पृष्ठभागावर उठणारे असंख्य तरंग पाहून मीं मनाशीं म्हटलं, वाराणसी नगरींत घडलेल्या अनेक नवलपूर्ण घटनांच्या स्मृतीनं कदाचित् तिचं अंतरंग हेलावत असेल!

हिंदुस्थानांत आर्य येण्यापूर्वी ज्या नगरींत द्राविड संस्कृतीचं वर्चस्व स्थापन झालं होतं, बौद्ध व जैन धर्मांच्या प्रसाराला ज्या नगरींपासून सुरुवात झाली होती, जैनांचा तेविसावा तिर्थंकर सुपार्श्वनाथ ज्या नगरींत जन्माला आला होता, आपला पंथ प्रस्थापित करण्यापूर्वीं आचार्यांना ज्या नगरींत स्वतःची मतं विद्वज्जनांकडून तपासून घेऊन मान्यता मिळवावी लागली होती, श्रीगौरांग महाप्रभु, श्रीचैतन्यादि तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या वैष्णव पंथाची ध्वजा ज्या नगरींत प्रथम फडकविली, वल्लभाचार्यांचा कीर्तिदुंदुभि ज्या नगरींत प्रथम दुमदुमला, संतकवि तुलसीदासांनीं 'रामचरितमानसा'चे सूर जिथं आळविले, त्या पुरातन

क्षेत्राचा विविध घडामोडींनीं भरलेला इतिहास आठवतांना गंगेच्या अंतर्यामांत हर्षविषादाच्या उर्मीमागून उर्मि न उठल्या तरच नवल!

तीनचार घाटांवरलीं मंदिर पाहून मी हिंदुयुनिव्हर्सिटीकडे मोर्चा वळविला.

शहरापासून थोड्याच अंतरावर हिंदुयुनिव्हर्सिटीनं प्रशस्त जागा व्यापली असून तिच्या लहानमोठ्या इमारती नवागताचं चटकन लक्ष वेधून घेतात. युनिव्हर्सिटीच्या परिसरांतले लालसर मातीचे सरळ, रेखीव रस्ते, त्यांच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांच्या रांगा, भारतीय शिल्प आणि वास्तुशास्त्र यांची ओळख पटविणाऱ्या टुमदार इमारती, त्यांच्या सभोंवार जोपासलेल्या मनोवेधक बागा इत्यादि गोष्टी विद्याभ्यासासाठीं आवश्यक त्या प्रसन्नतेंत भर घालीत असतील यांत शंका नाहीं.

विद्यापीठाच्या परिघांतच श्रीमान् बिर्लाशेठ यांच्या आर्थिक सहाय्यानं बांधलं जाणारं विश्वनाथाचं मंदिर पाहिलं. अद्याप बरंच बांधकाम व्हावयाचं राहिलं आहे. मंदिराच्या जागीं ठेवण्यांत आलेल्या संपूर्ण बांधकामाच्या आराखड्यावरून त्याच्या भविष्यकालीन शिल्पसौष्ठवाचा कांहींसा अंदाज मला बांधतां आला.

तक्षशिला, नालंदा, अयोध्या, विक्रमशीला, उदन्तपुरी इत्यादि विद्यापीठांप्रमाणंच काशीविद्यापीठाचाहि एकेकाळीं सर्वत्र बोलबाला झाला होता. स्वर्गीय मालवीयजींनीं प्रस्थापित केलेलं हें विद्यापीठहि काशीक्षेत्राची उज्ज्वल परंपरा पुढें चालू ठेवील अशी माझ्या मनानं ग्वाही दिली.

त्याच दिवशीं सायंकाळीं भारतमाता मंदिर, बिर्ला ग्रंथालय वगैरे ठिकाणं पाहून मी बाजारविभागांत फेरफटका मारला. पितळी भांडी, रेशमी कापड व त्यावरील नक्षीदार वीणकाम, बांगड्यावरील जरीचं नि कलाबतूचं काम, मातीचीं रंगीत खेळणीं, तऱ्हेतऱ्हेच्या घाटाचीं नि आकाराचीं, लाखेचा मुलामा चढवलेलीं मातीचीं भांडीं, वगैरे गोष्टींच्या बाबतींत एकेकाळीं काशीच्या कारागिरांची सर्वत्र ख्याति पसरली होती. ती आजहि पुष्कळअंशीं टिकून असल्याचं दिसून आलं.

बनारसपासून अवघ्या सात मैल अंतरावर असलेलं सारनाथ हें रम्य ठिकाण पाहण्यासाठीं मन ओढ घेत होतं; पण दुसऱ्या दिवसापासूनच पाटण्याच्या अधिवेशनाला प्रारंभ होणार असल्यामुळं मी तो बेत थोडा पुढें ढकलला व पाटण्याकडे कूच केलं.

आम्ही पाटण्यास पोहोचलों तेव्हां मध्यरात्रींचा सुमार होता. त्याच गाडीला परिषदेसाठीं आलेले आणखी बरेच प्रतिनिधि होते. पाटणाविद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्यार्थीवसतिगृहांत सर्वांच्या उतरण्याची सोय केली होती. जेवणाची व्यवस्थाहि त्या त्या हॉस्टेलच्या इमारतींत करण्यांत आली होती.

दुसरे दिवशीं सकाळीं स्नान वगैरे आटोपून आम्ही परिषदेच्या मंडपाकडे निघालों. आमच्या निवासस्थाना-पासून दोन तीन फर्लांग अंतरावर परिषदेचा भव्य मंडप उभारला होता. मंडपांत शिरतांक्षणींच त्याची भव्यता नि कलात्मकता पाहून मन प्रसन्न झालें. मंडपाचें निरीक्षण करीत असतांना अभावितपणें हैदराबादच्या शिक्षणपरिषदेच्या शामियान्याची आठवण होऊन मी मनांतल्या मनांत दोहोंची तुलना करूं लागलों. पाटण्याच्या मंडपा-सारखाच निजामाच्या राजधानींत पंचवीसाव्या शिक्षण परिषदेच्यावेळीं अवाढव्य शामियाना उभारला होता. पण पाटण्याच्या मंडपाची कुठें ती चित्ताकर्षक रमणीय कला-कुसर आणि कुठें तो हैदराबादच्या मंडपाचा कलाशून्य, बेडौल अवाढव्यपणा ! एक पाटलीपुत्राच्या वैभवकालांतील कलात्मकतेची साक्ष पटविणारा, तर दुसरा मुसलमानी राजवटीच्या विलासप्रिय पण भोंगळ दृष्टिकोनाचा प्रत्यय आणून देणारा !

बरोबर नऊ वाजतां मंडपानजीकच्या व्हीलर सिनेट-हॉलमध्यें कलाकौशल्याच्या व शिक्षणविषयक उपकरणांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन करण्यांत आलें. प्रदर्शन पाहिल्यानंतर मी एक दोघां परिचित शिक्षकांबरोबर पाटणा शहरांतून फेरफटका मारून यावयाचें ठरविलें.

बनारस व अलाहाबादप्रमाणें पाटण्यांतहि रिक्षांचा सुळसुळाट असल्याचें दिसून आलें. त्यांचे दरहि काशी, प्रयाग येथील रिक्षांच्या दरांप्रमाणेंच कमालीचे स्वस्त होते. असें असूनहि इथल्या रिक्षा नीटनेटक्या, आरसे, चित्रें इत्यादींच्या सहाय्यानें श्रृंगारलेल्या नि विशेष आरामशीर वाटल्या.

आम्ही रिक्षावाल्यास प्रथम पुराणवस्तुसंग्रहालयाकडे चलण्यास सांगितलें

मोंगल आणि राजपूतकालीन स्थापत्यविशेषांचा संगम साधून उभारलेली ही आधुनिक कालांतील वास्तु नवागतांचें चटकन् लक्ष वेधून घेतल्यावांचून राहत नाहीं. द्रविड व आर्यपूर्व युगापासून तों वैशाली, मौर्य, गुप्त यांच्यापर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडाला साक्षीभूत असलेले अनेक भग्नावशेष— स्तंभ, मूर्ति, आयुधें, नाणीं, मृत्तिकापात्रें इत्यादि वस्तू मोठ्या कटाक्षानें संग्रहित करून या इमारतींत मांडल्या आहेत. शिल्पकलेचे तर इतके विविध नमुने दृष्टीला पडतात

कीं तें पाहत असतांना अज्ञात कलावंतांच्या चातुरीचें, दगडांत संजीवन ओतून त्यांना मुखर करणाऱ्या प्रतिविधात्यांच्या विलासाचें कौतुक करायला जवळचा शब्दसंग्रह अपुरा वाटूं लागतो! बोटभर उंचीच्या मूर्तीपासून तों दहाबारा फूट उंचीच्या भव्य मूर्तीपर्यंत नाना प्रकारच्या लहानमोठ्या कलाकृति निरनिराळ्या दालनांत मांडून ठेवल्या आहेत. प्रत्येक कृतींत प्रमाणबद्धता नि भावदर्शन यांचा मधुर आविष्कार झालेला पहावयास मिळतो. मंदस्मितापासून तों विकट हास्यापर्यंत आणि क्रोधापासून तों उदात्तापर्यंत सारे मनोविकार प्रस्तराच्या अथवा ब्रॉंझ धातूच्या मूर्तींच्या चर्येवर व्यक्तवितांना शिल्पकारांनीं आपलें सारें कसब पणाला लावलें असावें असा राहून राहून माझ्या मनाला भास होत होता!

शिल्पाकृतीप्रमाणेंच मातीच्या भांड्यांवरील व लाकडी आयुधांवरील नक्षीकामहि प्रेक्षणीय वाटलें. उत्खननांत सांपडलेल्या दीड दोन हजार वर्षांपूर्वींच्या रांजणावरील अथवा निरनिराळ्या घाटांच्या मडक्यांवरील रंगीत नक्षीकाम नि नाजुक कलाकुसर आजच्या प्रगत म्हणविणाऱ्या मनुष्यासहि थक्क करील इतकें कलापूर्ण आहे!

प्रदर्शन पाहून झाल्यानंतर आम्ही 'गोलघराकडे' आपला मोर्चा वळविला. कांचेच्या उपड्या हंडीप्रमाणें

दिसणाऱ्या व विटांनीं बांधून काढलेल्या या गोलघराचा नकाशा दोनशें वर्षांपूर्वी जॉन गार्स्टिन नांवाच्या एका इंग्रज़ मनुष्यानें तयार केला होता असें म्हणतात. दुष्काळाच्या प्रसंगीं धान्याचा सांठा करून ठेवण्यासाठीं या घराचा उपयोग करण्यांत येई. याची उंची ९८ फूट असून भिंतीची रुंदी १२ फूट आहे. वर चढून जाण्यासाठीं बाहेरच्या बाजूनें वर्तुळाकार जिन्याप्रमाणें पायऱ्या बांधून काढल्या आहेत. नेपाळचा राजा जंगबहादुर हा घोड्यावर बसून या वाटोळ्या जिन्यानें गोलघरावर चढला व उतरला होता म्हणतात. दोन मोठमोठे भूकंप होऊनहि ही इमारत कोठेंहि तडा न जातां जशीच्या तशी शाबूत आहे यावरून तिच्या मज़बूत बांधणीची कल्पना करतां येईल! या इमारतीवरून सबंध पाटणा शहराचें विहंगमावलोकन करतांना मोठी मौज वाटते! लांबच लांब पसरलेला तो पाटणा शहराचा निरुंद पट्टा आणि त्याच्या कडेकडेनें वाहणारा गंगेचा विशाल, फेनधवल प्रवाह—कालौघावर क्षणकाल तरंगणाऱ्या मानवी कृतीच्या बुडबुड्यासारखें मला तें दृश्य भासलें.

गोलघरापासून जवळच खुदाबक्ष लायब्ररी आहे. प्रस्तुत ग्रंथसंग्रहालयाची इमारत कांहीं डोळ्यांत भरण्यासारखी

वाटली नाहीं. पण जगांतील उत्तमोत्तम फारसी व अरबी ग्रंथालयांत हिची गणना होते असे ऐकण्यांत आलें. दोन्ही भाषांतील सुमारें पांच हजार मूळ हस्तलिखित ग्रंथ येथें संग्रहित करून ठेवले आहेत. मुद्रित ग्रंथांची संख्याहि जवळजवळ तेवढीच असून शिवाय एक लक्ष रुपये किमतीची इंग्रजी पुस्तकेंहि ठेवण्यांत आलीं आहेत. जहांगीरनें लिहिलेल्या आत्मकथेची मूळ हस्तलिखित प्रत, तुलसीरामायणाचें हस्तलिखित व कांहीं दुर्मिळ संस्कृत ग्रंथहि येथें जपून ठेवले आहेत. मोंगल व राजपूत काळांतील चित्रकलेचे दुर्मिळ, सुंदर सुंदर नमुने संग्रहित करण्यांत या संस्थेच्या चालकांनीं आपली कलाविषयक अभिरुचिहि उत्तम प्रकारें व्यक्त केली आहे.

नतर आम्हीं 'हरमंदिर' नांवाचें शिखांचें पवित्र ठिकाण पाहिलें. गुरुगोविंदसिंहाच्या खडाव, पादत्राणें, तलवार, इत्यादि स्मृतिचिन्हांनीं हें स्थान पुनित झालें आहे. हें मंदिर रणजितसिंहानें आपल्या हयातींत बांधविल्याचें सांगतात. गुरुगोविंदसिंहाची स्वाक्षरी असलेली 'ग्रंथसाहेब' या शिखांच्या पवित्र धर्मग्रंथाची प्रतहि येथें ठेवली आहे.

दुपारीं तीन वाजतां परिषदेचें उद्घाटन व अध्यक्षांचें भाषण होणार असल्यामुळें आम्ही ग्रंथालय पाहून सरळ परिषदेच्या मंडपाकडे निघालों.

बिहार युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु व स्वागत समितीचे अध्यक्ष श्री. श्यामनंदन सहाय यांनीं स्वागतपर भाषण केल्यावर बिहारचे राज्यपाल श्री. रंगराव दिवेकर यांच्या हस्तें परिषदेचें उद्घाटन करण्यांत आलें. दोघांनींहि आपापल्या भाषणांत प्रचलित शिक्षणपद्धतींतील गुणदोष, शिक्षणाचें ध्येय, सरकारचें शिक्षणविषयक धोरण वगैरें मुद्यांसंबंधीं अधिकारवाणीनें विवेचन केलें. डॉ. र. पु. परांजपे यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत या मुद्यांबरोबरच आणखीहि बरेच महत्वाचे प्रश्न उपस्थित करून त्यांवर आपल्या अस्खलित, अमोघ वाणीनें सुमारें दीड तासपर्यंत चर्चा केली. त्यावेळीं त्यांच्या व्यासंगाबरोबरच शैलीदार वक्तृत्वाचाहि श्रोत्यांना प्रत्यय आला. वयाच्या ऐंशीआव्या वर्षीहि डॉक्टरसाहेबांच्या संभाषणांत आढळून येणारा तो आवेश नि तडफदारपणा, भरदार गौर शरीरयष्टि व श्रोत्यांच्या अंतरंगाचा ठाव घेणारी भेदक दृष्टि यांनीं सभेवर चांगलीच छाप पाडली.

आजच्या शिक्षकांकडून स्वातंत्र्यपूर्वकाळांतील शिक्षकांप्रमाणें त्यागाची अपेक्षा करणें कसें अन्यायाचें व चुकीचें ठरणार आहे हें विशद करतांना ते म्हणाले, '...The conditions then were quite different We were then under a foreign government which did not regard universal education as an objective to be achieved at an early date "

शिक्षणक्षेत्रांत प्रगति घडवून आणावयाची झाल्यास देशांतील तज्ज्ञ मंडळींच्या सहाय्यानें हें ध्येय साध्य होऊं शकेल, केवळ 'हम करेसो कायदा' या धोरणाचा अवलंब करणाऱ्या सरकारच्या हडेलहप्पी, आडमुठ्या वर्तनाला या कामीं यश येणें शक्य नाहीं, हा मुद्दा उपस्थित करून त्यांनीं सरकारला ज्या कानपिचक्या दिल्या त्या लक्षांत घेण्यासारख्या आहेत. ते म्हणाले—

"Government are inclined to think that they alone have a monopoly of educational wisdom, and that there can be nothing useful which they do not know or which at least does not originate from their own department."

दुसऱ्या दिवशीं मी एका स्नेह्याबरोबर कुम्हरार येथील उत्खनन पहावयास गेलों. पाटणा शहरापासून एक दीड मैल अंतरावर हें ठिकाण आहे. डॉ. वॅडेल या इंग्रज गृहस्थानें १८९५--९६ सालीं प्रथम येथील उत्खननाला सुरुवात केली. त्यानंतर १९१२ सालीं डॉ. स्पूनर यांनीं पुनः या कार्यास चालना दिली. ९२५ खांबांचें प्रचंड दालन असलेला चंद्रगुप्त मौर्याचा राजवाडा याच ठिकाणीं आसावा असें तेथें सापडलेल्या अवशेषांवरून संशोधकांनीं अनुमान बांधलें आहे.

यानंतर आणखी एक दोन महत्वाचीं ठिकाणें पाहून आम्हीं बसमधून संबंध पाटणाशहराचें धावतें निरीक्षण केलें. भिन्न भिन्न कालखंडांत पाटलिपुत्र, कुसुमपूर, पुष्पपूर इ. भिन्न भिन्न नांवांनीं ओळखल्या जाणाऱ्या आणि अनेक सत्तांच्या उत्थानपतनाला साक्षी असलेल्या या पुरातन शहरांत जागजागीं त्याच्या वैभवशाली इतिहासाच्या खुणा पहावयाला मिळतील अशी माझी अटकळ होती. पण ती खोटी ठरली. जिकडे तिकडे जुनाट, मोडकळीस आलेल्या इमारती दृष्टोत्पत्तीस येत होत्या. पण त्या सर्व अलीकडे, म्हणजे मुसलमानी अंमलाच्या वेळीं बांधलेल्या असाव्यात असें त्यांच्या विशिष्ट बांधणीवरून वाटत होतें.

परिषदेचे मुख्यमुख्य कार्यक्रम आटोपल्यावर तिच्या चालकांनीं माफक खर्चांत राजगीर व नालंदा हीं इतिहास-प्रसिद्ध स्थळें प्रतिनिधींना दाखवून आणण्याची व्यवस्था केली. बऱ्याच जणांनीं—विशेषतः दूरस्थांनीं—या संधीचा फायदा घेतला.

दि. ३० डिसेंबर रोजीं, सकाळीं आठ वाजतां आम्ही बसनें राजगीरकडे जावयास निघालों. सुमारें २५०–३०० उतारूंना पुरतील इतक्या बसगाड्या एकामागून-एक सोडण्यांत आल्या होत्या. पाटणाशहर मागें टाकून आमची बस भरधांव सुटली तेव्हां सडकेच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 23602 दि: 25-5-91
क्रमांक 236 नों. दि: 22/2/1

दोन्ही बाजूला डुलत असलेलीं गव्हाहरभऱ्याचीं पिकें माझा चित्तवेध करीत होतीं. हरितश्यामल, सस्यसंपन्न भूमीचें दर्शन दृष्टीला आल्हाद देत होतें. थोड्या अंतरावरून रस्त्याशीं समांतरपणें वाहणारा गंगेचा विशाल प्रवाहहि जड पंचात्मकांत कोंडलेल्या माझ्या मनाला कसली तरी अबोध, दिव्य प्रतीति आणून देत आहे असा सुखद भास होत होता!

भव्योदात्त प्रकृतीच्या सौंदर्याचें निरीक्षण नि चिंतन करण्यांत मी इतका गढून गेलों कीं पन्नास-साठ मैलांचें अंतर कापून आमची बस राजगीरला केव्हां पोहोंचली तें कळलेंहि नाहीं मला!



राजगीर

राजगीर ! प्राचीन काळांत संस्कृतीचें, राजकारणाचें व व्यापाराचें केंद्र म्हणून सर्वत्र बोलबाला झालेलें ठिकाण ! रामायणकाळीं वसू राजानें गिरिव्रज म्हणून जी नगरी वसवल्याचा उल्लेख सापडतो तें हेंच ठिकाण



राजगीर

होय. मगधाची प्राचीन राजधानी येथेंच होती. महाभारतकाळीं राजा बृहद्रथ व नंतर त्याचा पुत्र जरासंध यांनीं याच ठिकाणाहून राज्यकारभाराचीं सूत्रें चालविलीं असा पुरावा मिळतो. जरासंधानें बांधलेल्या किल्ल्याच्या व नगरीभोंवतालच्या दगडी तटाच्या खाणाखुणा आजमितीलाहि दृष्टीस पडतात. या तटाचा घेर पंचवीस मैल होता असें सांगण्यांत येतें. जरासंधाचें भीमाबरोबर जेथें भीषण गदायुद्ध झालें ती जागाहि अद्याप दाखविण्यांत

येते. पण एवढ्यावरच या स्थलाचें वैशिष्ट्य संपत नाहीं. भगवान बुद्धांनीं दोघां ब्राह्मणांकडून प्रथम विद्या ग्रहण केली ती येथेंच. विद्याभ्यासानंतर त्यांनीं याच स्थानाच्या परिसरांतील निवांत गिरिगुहरांत बसून तत्त्वचिंतन करण्यांत कांहीं दिवस घालविले. ज्ञानप्राप्तीनंतरहि ते या स्थळाला निरंतर भेट देत असत असें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहून ठेवलें आहे. सम्राट् अशोकानें संन्यासग्रहण केल्यावर आपलें उर्वरित आयुष्य याच रम्य ठिकाणीं व्यतित केलें. जैनांचें आद्य तीर्थंकर महावीर यांच्या चरणस्पर्शानेंहि ही भूमि अनेक वेळां पुनित झाल्याचा इतिहासांत उल्लेख आढळतो.

शतकानुशतकें मानवांना आकृष्ट करणाऱ्या या स्थळांत अशी कोणती जादू भरली आहे? निसर्गानें मुक्तहस्तानें येथें केलेली आपल्या वैभवाची उधळण हाच सर्वांच्या आकर्षणाचा विषय बनला असावा असें वाटतें. धनधान्याची समृद्धि, पाण्याची विपुलता, सुसह्य हवामान आणि असीम निसर्गसौंदर्य येवढ्या गोष्टींची अनुकूलता असल्यावर मनुष्याला आणखी दुसरें कोणतें प्रलोभन मोह पाडूं शकेल?

मानवांनीं एका काळीं उपभोगलेल्या ऐश्वर्याच्या पुसट छटाहि आज येथें पहावयास मिळत नाहींत; पण निसर्गानें

खुलें करून ठेवलेलें आपलें वैभवभांडार त्या काळांत जितकें संपन्न असेल तितकेंच आजहि दिसत होतें. झुळझुळ वाहणारे निर्झर आणि हिरवीगार वनश्री यांनीं हा पहाडी प्रदेश मोठा नयनरम्य वाटत होता. विपुला, वैभव, रत्न, उदय, इत्यादि काव्यमय नावांनीं येथील उत्तुंग पर्वतशिखरांना प्राचीन पुराणकर्त्यांनीं संबोधलें आहे, तर बौद्ध ग्रंथकारांनीं येथील वनराजींचा निर्देश वेणुवन, तपोवन, बुद्धवन, वगैरे अर्थपूर्ण अभिधानांनीं केला आहे. देवदत्त, सत्तपानी, राजपिंड या नावांनीं ओळखल्या जाणाऱ्या बुद्धकालीन लेण्यांनींहि या स्थळास विशेष शोभा आणली आहे. बौद्धांची पहिली महासभा सत्तपानी नांवाच्या गुंफेंतच भरली होती.

मला या स्थळाचा सर्वांत आकर्षक विशेष कोणता वाटला असेल तर तो येथील ऊन पाण्याच्या झऱ्यांविषयींचा !

आठ दहा प्रशस्त दगडी कुंडांत ऊन ऊन पाण्याचे झरे मोठ्या कौशल्यानें आणून सोडले आहेत. एकावेळीं शेंदीडशें माणसांना सहज स्नान करतां येईल इतका एकेका कुंडाचा ऐसपैस विस्तार आहे.

पुरुषभर उंचीवरून पडणाऱ्या एका उष्ण जलधारेंखालीं स्नान करतांना माझ्या अंगप्रत्यंगांतून ज्या अननुभूत

आनंदाच्या लहरी थरारून जात होत्या त्यांचें शब्दांनीं कुठवर वर्णन करावें ?

या कुंडांच्या कांठावर असलेलीं दोन तीन प्राचीन देवळेंहि तिथल्या प्रसन्न, निवांत वातावरणाची शोभा द्विगुणित करीत होतीं.

मध्यान्हाच्या प्रहरीं आम्ही त्या स्थळाचा निरोप घेऊन तिथून जवळच असलेल्या एका पाठशाळेच्या इमारतींत जेवणाचा कार्यक्रम उरकला व थोडी विश्रांति घेतल्यावर पुनः वाटचालीस आरंभ केला.

राजगीरच्या उत्तरेकडे थोड्या अंतरावर असलेली विश्व-विख्यात नालंदाची भूमि पाहण्यासाठीं आतां आम्हीं उत्सुक झालों होतों. ज्ञानोपासनेचें केंद्र म्हणून एकाकाळीं साऱ्या जगाच्या कुतूहलाचा विषय झालेलें हें इतिहासप्रसिद्ध स्थळ जसजसें जवळ येत चाललें तसतसे त्याच्याविषयींचे अनेक उल्लेख आठवून त्याच्या दर्शनासाठीं मन उतावीळ होऊं लागलें.

नालंदाविहाराच्या स्मृतीपाठोपाठ त्याच्याशीं निगडित असलेल्या यशोवर्मन्—हर्षवर्धनादि गुप्त राजांच्या वेळच्या अनेक घटना, प्रसंग चित्रपटाप्रमाणें माझ्या दृष्टीसमोरून

धावूं लागले; वैदिक, जैन, व बुद्ध या तिन्ही धर्मांच्या उत्कर्षकालाचें मनोहर दृश्य डोळ्यांसमोर तरळूं लागलें. हुएनत्सँग, इत्सिंग वगैरे चिनी प्रवाश्यांनीं या स्थळा-संबंधीं स्वानुभवानें लिहून ठेवलेलीं अनेक वर्णनें, अनेक आठवणीं अंतर्यामांत उसळून अनुभूत आनंदाच्या जाणिवेनें साऱ्या वृत्ति पुलकित झाल्या!


आणि नालंदाच्या भूमीवर पाऊल टाकतांच त्या विस्तीर्ण विहाराचा एकेक अवशेष जणूं सजीव होऊन माझ्याशीं सुखसंवाद करूं लागला!

ज्या विश्वविद्यालयांत चीन, जपान, तिबेट, लंका इत्यादि दूरदूरच्या देशांहून शेंकडों विद्यार्थी अध्ययनासाठीं येऊन



नालंदा विद्यापीठाचे अवशेष—नालंदा

राहत असत, जेथें सुमारें दहा हजार विद्यार्थी व एक हजार अध्यापक यांच्या निवासाची व भोजनाची निःशुल्क व्यवस्था करण्यांत येत असे, जेथें विविध शास्त्रें, विद्या आणि कला यांचें संपूर्ण ज्ञान छात्रगणांना दिलें जाई, जेथें अनेक वर्षें राहून निरनिराळ्या शास्त्रांत पारंगतता मिळविलेल्या हुएनत्सँगसारख्या चिनी पंडितानें विश्वविद्यालयाबाहेरील इतर भारतीय विद्वानांना वादविवादांत जिंकलें व प्रस्तुत ज्ञानपीठाची महति विशेष वेगळिकीनें सिद्ध केली, जेथें एकामागून एक कुलपतिपदावर आलेल्या धर्मपाल, चंद्रपाल, गुणमति, स्थिरमति, प्रभामित्र, ज्ञानचंद्र, शीलभद्र वगैरे परिणतप्रज्ञ पुरुषांनीं प्रस्तुत ज्ञानपीठाच्या कार्यक्षमतेंत न्यून पडूं दिलें नाहीं त्या विराट्, ख्यातकीर्त विहाराच्या



नालंदा विद्यापीठाचे अवशेष

सुवर्णेतिहासाचें एकेक पान माझ्या दृष्टीसमोरून उलटूं लागलें.

नालंदाविहारांत अनेक रमणीय बागा, सुंदर सरोवरें, कालवे, उंच उंच इमारती व मनोरे असल्याचा उल्लेख मी इतिहासांतून वाचला होता. पण आतां येथें त्यापैकीं कांहींहि शिल्लक नव्हतें. मात्र विटांनीं बांधून काढलेल्या अनेक खोल्या, ओटे, चौथरे, हौद वगैरे गोष्टी पहात असतांना त्या स्थळाच्या भव्यतेची व वैभवाची चांगलीच कल्पना येत होती. हुएनत्संगनें आपल्या स्मृतिग्रंथांत या विहाराचें मोठें बहारदार वर्णन करून ठेवलें आहे. या विहाराइतका मोठा व आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झालेला दुसरा कोणताहि विहार तत्कालीन हजारों विहारांत नव्हता असें त्यानें म्हटलें आहे.

अर्थात् त्याला ही दिगंत कीर्ति प्राप्त झाली ती केवळ या ऐहिक ऐश्वर्यामुळें नाहीं. सुमारें ८०० वर्षांचें प्रदीर्घ आयुष्य या विद्यापीठाला लाभलें तें केवळ याला गुप्त, मौखरी, वलभी इत्यादि अनेक घराण्यांतील राजांनीं आश्रय दिला म्हणून नव्हे; तर ज्योतिष, शिल्प, चित्रकला, गणित, संगीत वगैरेसारख्या विद्यांचें व कलांचें माहेरघर म्हणून जग या विद्यापीठाकडे पाही. नागार्जुन, आर्यदेव, वसुबंधु, दिङ्नाग यांच्यासारख्या चारित्र्यसंपन्न मेधावींची परंपरा

शतकानुशतकें चालविणारें एक समर्थ ज्ञानकेंद्र म्हणून लोक त्याच्याकडे आदरानें पहात! व्याकरण, साहित्य, तर्कशास्त्र, योगविद्या, मंत्रविद्या, जातकग्रंथ, महायानशाखा, ब्राह्मणधर्म वगैरे विषयांना येथील अभ्यासक्रमांत मिळालेलें स्थान पाहिलें म्हणजे तत्कालीन ज्ञानदात्यांचा विशाल, व्यापक नि निःपक्षपाती दृष्टिकोनाचा प्रत्यय आल्यावांचून राहत नाहीं.

असें हें सुसंपन्न ज्ञानमंदिर कालगतीच्या नियमास अनुसरून सहजरीत्या नष्ट झालें असतें तर मला त्याचा फारसा विषाद वाटला नसता. पण असहिष्णु वृत्तीच्या, धर्मद्वेष्ट्या म्लेंच्छांनीं खुनशीपणानें एकदोन वेळां नव्हे तर कैक वेळां त्यावर चढाई करून त्याचा विध्वंस केल्याच्या अनेक हकीकती मला आठवूं लागल्या आणि मन विषण्ण झालें.

बख्त्यार खिलजीसारख्या कट्टर धर्मद्वेष्ट्या सुलतानानें या पवित्र स्थानावर कैक वेळां हल्ला चढवून त्याचा विध्वंस करण्याचा क्रम सुरू ठेवला, तेथील इमारती पाडून टाकल्या, प्रचंड ग्रंथसंग्रह जाळून टाकला आणि विद्वान आचार्य व भिक्षु यांना ठार केलें! हूण राजा मिहिरकुल यानें यापूर्वीच हें विध्वंसनाचें कार्य उरकून टाकलें होतें; बख्त्यार खिलजी-

प्रमाणें त्यानेंहि नालंदांतील हजारों आचार्यांची व ज्ञान-भिक्षूंची कत्तल करून इमारतींची नासधूस केली होती. पण नरसिंह गुप्तासारख्या विद्याप्रेमी राजांनीं नालंदा विद्यापीठाची पुनः उभारणी करण्यांत यश मिळविलें.

हें यश बख्त्यारला न पाहवून त्यानें खुनशीपणानें विध्वंसनाची आपली असुरी लालसा तृप्त करून घेतली !

आठशें वर्षें निसर्गाचे व मानवांचे आघात झेलून आपलें अस्तित्व कायम ठेवणारें हें विद्यापीठ तेराव्या शतकांत बख्त्यारच्या अमानुष, पाशवी हल्लयाला बळी पडलें ते मात्र कायमचेंच ! त्या आघातांतून तें पुनः स्वतःला सावरूं शकलें नाहीं ! भारतालाच नव्हें तर अखिल विश्वाला उजळणारा हा ज्ञानदीप कायमचा मालवला गेला !

नालंदाच्या विनाशाचें हें करुण दृश्य डोळ्यापुढें तरळत असतांच मी त्या भूमीला विनितभावानें प्रणाम केला आणि पाटण्याकडे परत निघालों.

वाटेंत बिहारशरीफ या नांवाच्या गांवीं आम्ही थोडा विसांवा घेण्यासाठीं बसमधून खालीं उतरलों. ‘ उदंतपुरी महाविहार ’ म्हणून प्रसिद्ध असलेलें स्थान तें हेंच.

नालंदा, विक्रमशिला, नवद्वीप वगैरे ज्ञानपीठांप्रमाणेंच हेंहि केंद्र पाल राजांच्या आश्रयाखालीं इ. स. ७०० ते १२०० च्या दरम्यान भरभराटीस येऊन त्याचा सर्वत्र बोलबाला झाला होता. नालंदाप्रमाणेंच येथेंहि फार मोठा ग्रंथसंग्रह होता. पण दुष्टबुद्धि बख्त्यार खिलजीनें इ. स. ११९९ मध्यें हाहि बेचिराख करून तेथील भिक्षूंना जाळून टाकल्याचा पुरावा उपलब्ध आहे ! लांच्छित पुरुषांनाहि आपल्या पाठीमागें स्वतःच्या कुकर्मांचा पाढा वाचणारें स्मारक ठेवून जाण्याचा हव्यास असावा या घटनेचें मात्र मला नवल वाटत होतें !

दि. २१ रोजीं मी पाटणा शहर सोडलें व त्याच दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां सारनाथ येथें जाऊन पोहोंचलों. काशीपासून चारपांच मैल अंतरावर असलेलें हें स्थान मोठें रमणीय व आल्हादकारक वाटलें. येथील वस्तुसंग्रहालय, संग्रहालयाच्या आवारांतील बाग, जपानी व चिनी पद्धतीचीं मंदिरें, त्यांतील एका मंदिरांत विराजमान झालेली बुद्धदेवाची भव्य सुवर्णप्रतिमा, त्याच मंदिराच्या भिंतीवर एका जपानी चित्रकारानें चित्रित केलेले सिद्धार्थाच्या जीवनांतलें कांहीं उत्कट, भावपूर्ण

प्रसंग—या साऱ्या गोष्टींचा प्रवाश्यांच्या मनावर साकल्यानें घडून येणारा परिणाम, त्यांच्या अन्तःकरणावर उमटणारा ठसा कधींहि पुसला जणार नाहीं ! जपानी मंदिरापासून जवळच सारनाथाचें मंदिर व एक जैन मंदिर आहे.

ही सर्व मंदिरें पाहून मी बनारसला परतलों व तेथें रात्रभर मुक्काम करून दुसरें दिवशीं सकाळच्या गाडीनें मुंबईकडे कूच केलें.

# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास

[ सफर दुमरी ]

मैफलींत एखादी चीज गाऊन झाल्यावर तिचे मत्त स्वर कर्णसंपुटांत रेंगाळत रहावेत, गायकाच्या स्वरविलासानं चित्तवृत्तीवर चढलेली धुंदी तशीच तरळत असावी, तोंच दुसऱ्या चिजेची आलापी सुरू झाल्याचं ध्यानांत येतांच श्रोत्यांनीं सारं अवधान एकवटून स्वरसुधेचा कण न् कण टिपण्यासाठीं सुसज्ज व्हावं अशी कांहींशी स्थिति दिल्ली-आग्र्याच्या सहलीला निघतांना माझ्या अनुभवास आली !

अखिल भारतीय शिक्षणपरिषदेच्या २९ व्या अधिवेशनाच्या निमित्तानं गतवर्षी पाटण्यास जाण्याची मला संधि मिळाली होती. पाटण्याबरोबरच राजगीर, नालंदा, काशी, प्रयाग, सारनाथ इत्यादि इतिहासप्रसिद्ध स्थळांचं दर्शन घेण्याचा योगहि मी हातचा जाऊं दिला नव्हता !

धार्मिक, सांस्कृतिक वा राजकीय दृष्ट्या एका काळीं मान्यता पावलेलीं तीं उत्तर प्रदेशांतलीं ठिकाणं पाहत असतांना गतकालाच्या साक्षात्कारान धुंदावलेलं माझं मन अद्यापहि त्या अलौकिक उन्मनावस्थेंत घुटमळत होतं. काळपुरुषाच्या कंठांतून प्रकट होणारी एखादी गंभीर प्रकृतीची रागिणी ऐकत असल्याचा विलक्षण सुखद संभ्रम अजूनहि पुरता ओसरला नव्हता !

त्या सुखद आभासांतून बाहेर पडण्यापूर्वीच १९५५ चा डिसेंबर महिना उजाडला आणि—

'नवरात्र संपलें, दसरा उजाडला' या चालीवर एम्. ए. उपाध्ये ( मोरेश्वर अ. उपाध्ये ) यांची निकटवर्ती मंडळी त्यांना म्हणाली, "मोरू उठ, रेल्वे कन्सेशनचे फॉर्म आण, रिझर्वेशनची व्यवस्था कर........"

उपाध्यांनीं सिगारेटची राख आणि आळस झटकून 'तुमचा उत्साह स्तुत्य आहे' अशा अभिप्रायाचा मिस्किल कटाक्ष मित्रमंडळीवर टाकला आणि ते प्रवासाविषयींच्या व्यवस्थेला लागले.

आंधळ्यानं एक डोळा मागितल्यावर त्याच्या पदरांत दामदुपटीनं कृपेचं माप टाकणाऱ्या परमेश्वरापेक्षांहि एका सीटचं रिझर्वेशन मागितल्यावर दिल्लीसाठीं स्पेशल गाडी सोडणाऱ्या ट्रॅफिक मॅनेजरचं औदार्य आम्हाला कौतुकास्पद वाटलं! मात्र त्याचं हें औदार्य उत्स्फूर्त नव्हतं! आपल्या शाळेंतील कार्यकुशल व उत्साही शिक्षक श्री. आगाशे, श्री. मो. अ. उपाध्ये इत्यादि मंडळीनं रेल्वे अधिकाऱ्याची प्रत्यक्ष भेट घेतली अन् त्याला एक साधं गणित घातलं! नेहमीच्यावेळीं गाडींतल्या गर्दीनं उतारूंचा जीव अर्धमेला होतो तर नाताळसारख्या सुट्टींत तीच संख्या दुप्पट झाल्या-वर त्यांच्या जीवनमरणाचं परस्पराशीं गुणोत्तर प्रमाण काय?

त्या गणिताच्या उत्तरांतला भयंकर धोका लक्षांत घेऊन रेल्वे अधिकाऱ्यानं दिल्लीस जाणाऱ्यासाठीं खास जादा गाडी सोडण्याचं आश्वासन दिलं.

शशशृंग, उंबराचं फूल, खपुष्प इत्यादि जुन्या संकेतांच्या बरोबरीनं खाणावळींतल्या आमटींतली डाळ, बिनपागडीची जागा, पुस्तक वाचून अभिप्राय लिहिणारे टीकाकार वगैरे सारखे जे कांहीं आधुनिक संकेत निर्माण झाले आहेत त्यांतच आगगाडींतली ऐसपैस मोकळी जागा हाहि एक मोडण्यासारखा असल्यामुळं आगाशे मास्तरांनीं आणलेल्या त्या बातमीवर आमचा विश्वासच बसेना. पण चोवीस डिसेंबर रोजीं संध्याकाळीं बोरीबंदरहून सुटलेल्या जादा पंजाब–मेलमध्यें अस्मादिकांनं एक सबंध बांक अडवून ऐसपैसपणें आपलं होल्डॉल पसरलं तेंव्हां कुठं तो संकेत नसून जिवंत अनुभूति असल्याची पक्की खात्री झाली!

उपनगरांतलीं स्टेशनें भराभर मागं टाकून आमची गाडी जसजशी पुढें धावूं लागली तसतशा आमच्या गप्पाहि रंगूं लागल्या.

उपाध्यांनीं हळूंच एखादा मार्मिक विनोद करावा, आगाशांनीं आपल्या सातमजली हास्यानं त्या विनोदाचं दिलखुलास स्वागत करावं, साठ्यांनीं ओंठाबाहेर आपलं हंसू न फुटूं देण्याची दक्षता बाळगीत पण अंतर्यामीं आगाशांइतकाच हास्यरसाचा आनंद लुटींत 'वाग्यज्ञांत' सामील व्हावं, धामणकरबाई व दीक्षितबाई यांनींहि मधून मधून लोंकरीचं वीणकाम थांबवल्याप्रमाणं करून गप्पाष्टकांत भाग घ्यावा याप्रमाणं हास्यविनोदांत गढून गेल्यामुळं

गार्डानं कसाऱ्याचा घाट केंव्हां मागं टाकला हें कळलं-सुद्धां नाहीं आम्हाला !

पण व्याकरण काय, काव्य काय किंवा गप्पा काय यांपैकीं भुकेल्या पोटाला कशाचाच उपयोग होऊं शकत नाहीं हेंच खरं. आठ—साडेआठ वाजण्याच्या सुमारास उपाध्ये मास्तरांनीं आगाशे यांचा फराळाचा डबा उघडून सर्वांच्या मधोमध ठेवला.

शनिवारचा उपवास असल्यामुळं मी अन् साठेच काय ते त्या पंक्तींत सामील झालों नाहीं. साठ्यांनीं साबूदाण्याची खिचडी अन् इतर ' सात्त्विक ' पदार्थ आपल्याबरोबर आणले होते. पण उपाध्यांच्या डब्यांतली कांदाबटाट्याची भाजी आमच्या आध्यात्मिक धारणेचं खोबरं करणार कीं काय अशी मधून मधून भीति वाटत होती ! त्यांच्या डब्याकडे वारंवार धांव घेणाऱ्या आमच्या ओढाळ नजरेला रेल्वेखात्याच्या सूत्रांचं मनन करण्यांत गुंतवून टाकलं. ' नाहक जंजीर खींचनेसे ....' ' रेल्वे-यात्रीयोंको चेतवणी दी जाती है की यह भारतीय संपत्ति की सुरक्षा की जिम्मेदारी....' ' कृपया जलती दिया सलायी....' इत्यादि ' प्रधान यातायात व्यवस्थापकाच्या ' ( चीफ ट्रॅफिक मॅनेजरच्या ) विनंतीवजा हुकुमावरून डब्यांत लिहिलेलीं सुभाषितं वाचतांना विस्कटूं पाहणारी मनोनिग्रहाची घडी पुनः सफाईनं बसवितां आली !

रात्र जसजशी वाढूं लागली तसतशी थंडीची तीव्रता जाणवूं लागली. प्रत्येकजण आपापल्या अंगाभोंवतीं शाल, चादर किंवा ब्लँकेट लपेटून घेऊन थंडीचा प्रतिकार करूं लागला संकटाच्या क्षणीं मायेच्या माणसाचा प्रेमळ हात पाठीवरून फिरावा तसा मऊ, ऊबदार पांघरुणाचा स्पर्श भासत होता. किंबहुना, जिव्हाळ्याच्या व्यक्तींच्या हळुवार स्पर्शांतलं सौख्य प्रचीतीस आणून देणाऱ्या विपत्तींविषयीं एक प्रकारची आत्मीयता वाटावी तसा हवेंतला गारठा हवाहवासा वाटूं लागला.

मात्र दुसरे दिवशीं आमची गाडी जसजशीं उत्तर प्रदेशांतलीं स्टेशनं मागं टाकूं लागलीं तशतशी थंडीतली काव्यमयता ओसरत जाऊन हवा म्हणजे 'एकपंचमांश महाभूत' येवढीच गद्य जाणीव आमच्या मनांत शिल्लक राहिली !

भर दुपारीं जाणवणारा थंडीचा कडाका मला अवेळीं गायिल्या जाणाऱ्या रागदारीसारखा चमत्कारिक वाटूं लागला ! झांशी शहराच्या खुणा दृष्टीला पडतांना मात्र ऐहिकाविषयींच्या चिंतनांत गुरफटून गेलेलं माझं मन त्यांतून बाहेर पडून एक दिव्य, अलौकिक विचारानं भारावून गेलं. 'मेरी झाँसी कभी नहीं दूँगी ! " हे इंग्रजांना बाणेदार-पणानं उत्तर देणाऱ्या कि विद्युलतेप्रमाणं त्यांच्यावर तुटून

पडणाऱ्या रणदेवतेच्या अद्भुत शौर्याचे पवाड त्या ऐतिहासिक पुण्य नगरीच्या परिसरांतील वस्तूवस्तूंतून निनादत असल्याचा विलक्षण रोमांचकारी आभास मला होऊं लागला.

पण कांहीं झालं तरी आम्हा तंथाकथित सुशिक्षितांची ही 'दिव्यत्वाची प्रचीति' माफक नि कामचलाऊच म्हणावयाची? झांशी शहराच्या दर्शनानं मी काय किंवा माझे इतर प्रवासी बंधू काय, स्तिमित झालों असलों तरी क्षणभरच ती अवस्था टिकली! दुसऱ्याच क्षणीं आम्हा मुशाफिरांना गतकालांतून वर्तमानांत फरफटत ओढीत आणलं तें झांशी स्टेशनवर गिऱ्हाइकाच्या आशेनं फेऱ्या घालणाऱ्या न्हाव्यांनीं! इंग्रजांशीं शह देतांना वीरश्रीनं स्फुरण पावलेल्या मराठ्यांच्या बाहूंतलं सळसळणारं रक्त किती उष्ण असेल याचा क्षणापूर्वी अंदाज घेणारं आम्हा प्रवाश्यांचं मन आतां त्या न्हाव्यांजवळच्या चिमुकल्या शेगडीवर तापणाऱ्या पाण्याचं उष्णतामान किती असेल याविषयीं तर्क लढविण्यांत गढून गेलं. मराठ्यांच्या कमरेला तळपणाऱ्या समशेरींचं सौंदर्य न्यहाळणारे आमचे मनश्चक्षू गिऱ्हाइकांच्या चेहऱ्यांवरून फिरणाऱ्या कारागिरांच्या आयुधांची धार कितपत तीक्ष्ण असेल याचा शोध घेण्यांत तल्लीन झाले! आम्ही आपापल्या चेहऱ्यावरून सहज हात फिरवून पाहिला, तेव्हां दाढी-मिशांचीं खुंट—छेः! संस्कृतीच्या नि सभ्यतेच्या राखणदारींत अंतर पडल्याची विषाद-

युक्त जाणीव–तीव्रतेनं टोचूं लागली! आम्ही भराभर डब्या-बाहेर पडलों आणि आधुनिकतेच्या सोपस्कारांसाठीं आपापला चेहरा न्हाव्याच्या सुपूर्त केला.

श्रोत्यांनीं हळुवार चित्तानं आपल्या काव्याचा आस्वाद घ्यावा अशी विनंति करतांना ज्ञानेश्वरादि कविराय चकोर, भ्रमरादिकांच्या 'मवाळ' वृत्तीचा दृष्टान्त देत असतात. उभा जन्म शेअर बाजारांत किंवा कस्टम खात्यांत घाल-विणाऱ्या गद्य जिवांना या दृष्टांतांतलं स्वारस्य उमजेनासं झालं म्हणजे माझा एक फटकळ मित्र, गिऱ्हाइकाला नकळत हलक्या हातानं त्याचं क्षौरकर्म उरकणाऱ्या 'ब्रॉडवे' सलूनमधल्या कारागिरांचा दृष्टांत त्यांच्या तोंडावर फेकीत असतो! पण झांशीची नाभिक मंडळी काव्याचं रसग्रहण करणाऱ्यांपेक्षां कवींचे वाभाडे काढणाऱ्या मराठी टीकाकारांच्या सांप्रदायांत मोडणारी असावी अशी माझी खात्री पटली!

बाकीं न्हाव्यानं एक गाल रक्तबंबाळ केला तरी त्याच्या पुढें दुसरा गाल करणारे आधुनिकतेचे उपासक आणि दुष्मनानं एका गालावर मारलं तरी त्याच्यापुढें दुसरा गाल करायला सांगणारे खिस्तानुयायी यांच्यापैकीं 'झगेवाल्या मंडळीचीच' सहिष्णुता कपोलकल्पित ठरेल या विचारानं स्वतःशीं हंसूं आलं मला!

जागजागीं खरचटे अन् ओरखडे पडलेले आमचे चेहरे क्षणांत समरांगणावर लढणाऱ्या पुरुषांसारखे ऐतिहासिक तर क्षणांत रेल्वे अन् नद्या यांचं जाळं पसरलेल्या नकाशा-प्रमाणं भौगोलिक स्वरूपाचे दिसूं लागले!

आम्हीं आग्र्यास पोहोंचलो तेव्हां रात्रीचे दहा वाजत आले होते. सतत तीस तासांच्या प्रवासानं आमचीं शरीरं सुस्तावलीं होतीं, भुकाहि सपाटून लागल्या होत्या. स्टेशनवर उतरल्याबरोबर सरळ महाराष्ट्र-मंडळाच्या रोखानं कूच करायचं असा आम्ही आपल्या मनाशीं हिशेब केला होता. पण महाराष्ट्र-मंडळच काय, हिब्रू अन् पुश्तू मंडळांच्या इमारती त्यावेळीं आग्र्यांत असत्या तर तिथंहि आम्हाला पाय ठेवायला जागा मिळाली नसती! " शहरांतल्या साऱ्या लहानमोठ्या हॉटेलांत नि निवासस्थानांत मुशा-फिरांची गर्दी झाली असल्यामुळं आतां तुम्हाला कुठंहि जागा मिळणार नाहीं " असं तिथल्या हमालानं आम्हाला सांगितलं तेव्हां थंडीपेक्षांहि त्या भयकर बातमीमुळं आमचे पाय लटलट कापूं लागले.

न जाणां, हमालाच्या सांगण्यांत कांहीं राजकारण (अर्थकारण?) असण्याचा संभव असावं अशी आमच्यापैकीं एकाला शंका येऊन त्यानं स्वतः महाराष्ट्र मंडळांत जाऊन वस्तुस्थितीचा कानोसा घ्यायचं ठरविलं. आणखी तिघेचौघे इतर ठिकाणीं जागेचा शोध करण्यासाठीं निघून गेले.

तास दीड तास झाला तरी गेलेल्यांपैकीं कोणीच परत येण्याचं चिन्ह दिसेना तेव्हां "रात्र संपली पण चौकशा संपल्या नाहींत !" असा एका वाङ्मयीन उद्गाराच्या चालीवर नवा उद्गार माझ्या तोंडून बाहेर पडला.

इतक्यांत कोणीतरी बातमी आणली कीं महाराष्ट्र-मंडळाच्या व्यवस्थापकांनं एका रात्रीपुरती दहा-बारा उतारूंची कशीबशी सोय करण्याचं आश्वासन दिलं आहे ! बळीनं तीन पावलं भूमि दान दिल्यावर वामनाला झाला नसेल इतका आम्हाला ती बातमी ऐकून हर्ष झाला.

मंडळाच्या इमारतींतल्या एका लहानशा दमट खोलींत आम्ही आपलं सामान रचलं आणि जेवण उरकल्यावर रात्रीं बाराच्या सुमारास ताजमहाल पहावयास निघालों. धूसर, संगूढ चंद्रप्रकाशांत डुंबलेल्या त्या नगरीला मध्यरात्रीच्या नीरवतेमुळं एक वेगळंच सौंदर्य प्राप्त झालेलं दिसत होतं ! धवल वस्त्र परिधान केलेल्या एखाद्या ध्यानमग्न तपस्विनी-सारखी ती भासत होती !

ताजमहालच्या मुख्य प्रवेशद्वारापाशीं आमच्या रिक्षा थांबल्या तेव्हां त्या भव्य, कलात्मक वस्तूच्या सान्निध्यांत आल्याच्या जाणिवेनं माझ्या साऱ्या शरिरावर अननुभूत आनंदाचे रोमांच उभे राहिले. विस्तीर्ण, रम्य वाटिकेच्या परिसरांत उभी असलेली ती अतिव सुंदर कलाकृति पाह-

तांना माझ्या मनांत नाना प्रकारच्या उत्प्रेक्षांची गर्दी झाली. प्रियकराच्या भेटीसाठीं संकेतस्थळीं आलेली ही कोणी अभिसारिका तर नसेल? एखाद्या महाकवीची प्रतिभा पार्थिव रूप धारण करून तर प्रकट झाली नसेल? एखाद्या शापभ्रष्ट अप्सरेला तर प्रस्तराचा जन्म घ्यावा लागला नसेल?....

इतक्यांत या रम्योदात्त कल्पनांच्या पाठोपाठ असाहि एक मिस्किल विचार मनांत आला. ताजमहाल संपूर्ण बांधून झाल्यावर शहाजाननं अशाच एका चांदण्या रात्रीं खुशींत येऊन आपल्या खुषमस्कऱ्याला विचारलं असावं, "क्यों बे गधे, यहा मकबरा तुझे कैसे दिखाया देता है?" तेंव्हां खुषमस्कऱ्यानं आदबीनं पण आपल्या उपजत आचरट-पणाला अनुसरून उत्तर दिलं असावं, "वा:! सरकार, इस आलीशान महल की क्या तारीफ सुनाऊँ? कुदरत की मुर्गीने मानों यह सफेत अंडा दिया है! या दूधपर जमी हुई यह मलाई है, या........परवर दिगारसे माफी चाहता हूँ........हमाम खाने में साबुन के पानीसे भरे हुये हौजमें आपकी बेगमसाहेबाँ न्हानेका मजा लूट रही है...."


ताजमहालच्या दर्शनानं मनांत नानाप्रकारचे कल्पना-तरंग उठूं लागले खरे, पण कांहीं क्षणच! वायुलहरीच्या स्पर्शानं जलाशयाच्या पृष्ठभागावर क्षण दोन क्षण वलयं उठावींत नि पुन: विरून जावींत त्याप्रमाणं मनांतले सारे

अनुक्रम ........ क्रमांक ........ 

तरंग, सारे विचार अल्पावधींतच नाहींसे होऊन तें मंत्रमुग्ध बनलं! त्याची विचाराची प्रक्रियाच जणूं कुंठित झाली! अबोध, अव्यक्त तत्वाचा साक्षात्कार घडत असतांना एखाद्या मुक्ताला आपली दिव्य, तरल अनुभूति शब्दांत निबद्ध करतां येऊं नये तशी त्या मनोज्ञ कलाकृतींचं सौंदर्य न्यहाळीत असतां माझी अवस्था झाली.

इतक्यांत कोणीतरी चिंतातुर जंतु आर्थिक भूमिकेवरून विव्हळला, "अबब! किती पैसा लागला असेल ही इमारत उभी करायला?—"

पुढें तो काय म्हणाला हें मी ऐकलं नाहीं. पण बहुधा, "इतके पैसे शहाजहानं व्याजी लावले असते तर कितीतरी



'ताजमहाल' आग्रा.

फायदा झाला असता!" असाच कांहींतरी उपयुक्ततावादी 'सहजोद्गार' त्याच्या तोंडून बाहेर पडला असावा अशी माझी खात्री आहे!

चांदण्यांत दृग्गोचर होणारा ताजमहालचा बाहेरील भाग पाहून झाल्यावर आंतील कारागिरीचं निरीक्षण करण्याचा बेत आम्ही दुसऱ्या दिवसावर टाकला आणि निवासस्थानाकडे वळलों.


दुसरें दिवशीं सकाळींच फत्तेपूर सिक्रीला जाण्यासाठी आम्ही बस ठरविली. आग्र्यापासून तेवीस अंतरावर हें इतिहास प्रसिद्ध ठिकाण वसलं आहे. चौदाव्या शतकापर्यंत या स्थानावर राजपुतांचा अंमल होता. बाबर आणि महाराणा संग्रामसिंह यांच्यांत घनघोर युद्ध झालं तें याच ठिकाणीं. या युद्धांत बाबरला विजय मिळाल्यामुळें त्यानं या स्थळाला फत्तेपूर हें नांव दिलं असं कांहीं इतिहासकारांचं म्हणणं आहे, तर कांहींजणांचा या बाबतींत मतभेद आहे. त्यांचा असा अभिप्राय आहे कीं अकबर गादीवर येईपर्यंत या स्थानाचं सिक्री हेंच नांव कायम होतं. परंतु त्यानं गुजरातेंत विजय संपादन केल्यावर या स्थळाला फत्तेपूर सिक्री हें नांव दिलं.

अकबरनं या ठिकाणीं आपली राजधानी आणली याला एक महत्वाचं कारण घडलं. सिक्रीला एका टेकडीवर शेख

सलीम चिस्ती नावाचा एक आवलिया राहत असे. हा साधु ( पीर ) आपल्या आत्मिक सामर्थ्यानं आपद्ग्रस्तांच्या आधिव्याधी दूर करतो असा त्याच्याबद्दल सर्वत्र बोलबाला पसरला होता. अकबर सम्राट् असला तरी त्याच्याहि जीवनांत एक उणीव होतीच. त्याची संतती वाचत नसे. त्यानं शेख सलीमजवळ आपली मनोव्यथा प्रकट केली. सलीमनं त्याला, ' तुझ्या मनासारखं सर्व कांहीं घडेल ' असा आशिर्वाद दिला अन् खरोखरच थोड्याच दिवसांनीं अकबरला मुलगा झाला ! पुत्रजन्माच्या खुशींत त्यानं सिक्रीचा कायापालट करून टाकला. एका मामुली, लहानशा गांवाचं सुंदर नगरींत रूपांतर केलं. देशोदेशींच्या अनेक कारागिरांना पाचारण करून त्यानं त्यांच्या करवीं मोठमोठे प्रासाद बांधले, मशिदी उभारल्या बाग-बगीचे निर्माण केले....सारांश राजधानीच्या इमारतींत नि इतमामांत भर घालायला ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्या त्या सर्वांची त्यानं जोड करून दिली. पण सिक्रीचं हें वैभव फार दिवस टिकलं नाहीं. अकालीं वैधव्य प्राप्त झालेल्या दुर्दैवी स्त्रीची अवकळा तिला प्राप्त झाली. पाण्याच्या दुर्भिक्षामुळं म्हणा किंवा कांहीं इतिहासकार सांगतात त्याप्रमाणं अकबराच्या गुरुनं त्याला स्थलांतर करण्याचा आदेश दिल्यामुळं म्हणा, त्यानं आपली राजधानी आग्र्याला हलवली.

सिक्रीच्या ऐश्वर्याची साक्ष पटविणाऱ्या थोड्याच गोष्टी आजमितीला तिथं शिल्लक आहेत. मात्र ज्या आहेत त्या सुरक्षित, सुस्थितींत आहेत. त्यांची फारशी पडझड झालेली दिसली नाहीं, किंवा आज तें ठिकाण निर्मनुष असूनहि तिथं काटेरी झुडुपं उगवलीं नाहींत, कीं त्या स्थळाला भयाणताहि आली नाहीं !

अकबरानं स्वतःला राहण्यासाठीं व राज्यकारभारासाठीं बांधलेल्या लाल दगडांच्या भव्य इमारती इंग्रजांनीं प्रयत्न-पूर्वक जतन करून ठेवल्या. तसं त्यांनीं मराठ्यांच्या किल्ल्यांकडे कां लक्ष दिलं नाहीं याचं मात्र राहून राहून सखेदाश्चर्य वाटत होतं माझ्या मनाला.



पंचमहाल—फत्तेपूर सिक्री.

भव्यता आणि कलाकुसर यांचा प्रत्येक बांधकामांत सुरेख संगम झालेला पहायला मिळत होता. नौबत खाना, दफ्ताह खाना (सरकारी कचेरी) पंच महाल, जोधाबाई-मरियम, वगैरे राण्यांचे महाल, हवा महाल, बिरबलचं निवासस्थान, नवरत्नांचा दरबार, संगीत बुर्ज, नगीना मस्जीद, हिरन मिनार, शेख सलीमचं कबरस्तान, इत्यादीपैकीं बहुतेकांवर उमटलेला राजपूत व इराणी शिल्पकलेचा संमिश्र ठसा अकबराच्या सौंदर्यदृष्टीबरोबरच त्याच्या समन्वयी, उदारमतवादी धोरणाची साक्ष पटवितात.

पण अकबरकालीन शिल्प काय किंवा त्याच्या आधारानं लिहिला गेलेला इतिहास काय, अकबरच्या निःपक्षपाती-पणाचा नि औदार्याचा कितीहि निर्वाळा देऊं पहात असले तरी मला मात्र त्याच्या गुणवत्तेचं निरपवादपणें कौतुक करतां आलं नाहीं. अकबर कितीही मुत्सद्दी, धोरणी अन् उदार हृदयाचा असला तरी राणाप्रतापसारख्या एका नेकजात, प्रामाणिक शूर पुरुषाला सिंहासनावरून पदच्युत करून देशोधडीला लावतांना त्यानं माणूसकीलाहि आपल्या अंतःकरणांतून हद्दपार केलं होतं हें शल्य कोणता हाडाचा हिंदु विसरूं शकेल?

सिक्रीच्या इमारती पाहिल्यानंतर आम्ही त्याच दिवशीं दुपारीं आग्र्यास परत आलों आणि लालकिल्ला, सिकंदरा,

चिनी का रोजा, रामबाग, एतमाउद्दौला का मकबरा, व दयाळबाग हीं प्रेक्षणीय स्थळं पाहून टाकलीं. आदल्या रात्रीं पहावयाचा राहून गेलेला ताजमहालचा आंतील भागहि दुपारीं पाहून टाकला. दयाळबागेंतील राधास्वामीचं मंदिर ताजमहालप्रमाणंच संपूर्णपणें संगमवरी दगडाचं पण प्राचीन हिंदु शिल्पशास्त्रानुसार बांधलं जात आहे. अद्याप मंदिराचा बराचसा भाग अपूर्णावस्थेंत आहे. तो पूर्ण होण्यास आणखी कित्येक वर्षं लागतील असं तिथल्या कारागिरांनीं आम्हांला सांगितलं. मात्र जेवढा भाग बांधून तयार झालेला आहे त्यावरून भव्यतेच्या नसली तरी ऐश्वर्याच्या व कला कौशल्याच्या बाबतींत ताजमहालच्या तुलनेंत बसेल इतकी सुंदर, रमणीय वास्तु भवितव्यतेच्या पोटीं जन्म घेणार आहे असं सहज भाकित करतां येण्यासारखं होतं !

मोंगल सम्राटांच्या विलासी, कलात्म वृत्तीची ग्वाही देणारीं आग्रा शहरांतलीं अनेक बांधकामं पहात असतांना सिक्रीप्रमाणेंच याहि वेळीं त्यांचा सौंदर्यास्वाद मी त्रयस्थाच्या भूमिकेवरून, तटस्थतेची वृत्ति स्वीकारून घेऊं शकलों नाहीं. लाल किल्ल्याच्या परिसरांतलीं एकापेक्षां एक वरचढ अशीं चतुराईनं निर्माण करून ठेवलेलीं दालनं अन् प्रशस्त महाल पाहतांना तिथल्या लाल नि संगमवरी दगडाच्या कणाकणांतून व्यक्त झालेली अपूर्व कलाकुसर न्यहाळतांना त्या कलाकृतींशीं निगडित असलेला, मोंगल बादशहांच्या

कृष्णकारस्थानांचा, जुलुमजबरदस्तींना नि अन्यायाचा इतिहास मला दृष्टिआड करणं शक्य नव्हतं! एखाद्या विषकुंभाच्या दर्शनी भागाच्या मोहकतेनं मन हरखून जातांना आंतल्या दाहक द्रवाच्या जाणिवेनं त्या वृत्तींत विषण्णतेची छटा मिसळल्याशिवाय कशी राहील?

लालकिल्ल्यांतील सम्मन बुर्ज, हमामखाना, शीस महाल, खास महल, अंगूरीबाग, मीना मशीद, मच्छी भवन, मीना बाजार, सलीमगढ, मोती मशीद वगैरे कृति म्हणजे कालाच्या आलेखपृष्ठावरले कलात्मकतेनं गांठलेले परमोच्च बिंदु म्हणावयाचे! रंगीबेरंगी प्रकाशझोतांत कारंजांतून उसळणाऱ्या तुषारांना निरनिराळ्या फुलांचा आकार व सुगंधहि प्राप्त व्हावा अशा प्रकारची चतुराईची संयोजना करविणाऱ्या मोंगल राज्यकर्त्यांची कलात्मवृत्ति कळसाला पोंचली नव्हती तर काय?

पण कलात्मकतेबरोबरच तत्कालीन शास्त्यांच्या अमानुषपणानंहि उत्कर्षबिंदु गांठला असल्याच्या कांहीं खुणा, कांहीं साक्षी किल्ल्यांत आज तागायत कायम होत्या. लहानसहान अपराधावरून दासदासींना जिथं कोंडून ठेवून, त्यांचे हालहाल करून जीव घेण्यांत येत तें विहीरवजा तळघर—छेः मृत्यूचा जबडाच—गुन्हेगारांना हत्तीच्या पायाखालीं तुडवून ठार करण्यासाठीं राखून ठेवलेलं खास

मैदान, दुष्मनांना प्रजेसमक्ष फांशी द्यावयाची जागा इत्यादि गोष्टी पहात असतांना निर्भेळ कलास्वादाचा आनंद कुठून मिळूं शकणार ?

उलट, लालकिल्ला म्हणजे अप्रतिम कारागिरीचा नमुना, असा अंतःकरणावर ठसा न उमटतां लाल किल्ला म्हणजे शिवरायाचा तेजोभंग करून त्या पुण्यश्लोकाला अटकेंत ठेवणारं एक अजस्र, निष्करुण कारागृह; लालकिल्ला म्हणजे मोंगलाकडून लुटल्या गेलेल्या चितोडच्या वैभवाच्या नि सामुग्रीच्या बळावर उसना दिमाख मिरविणारं लुटारूंचं आश्रयस्थान; लालकिल्ला म्हणजे मीनाबाजारांत विहार करण्याच्या मिषानं रूपकुलवान स्त्रियांना पाचारण करून त्यांच्या शीलाचा अपहार करूं पाहणाऱ्या भोगपरायण, स्त्रीलंपट सम्राटांचं क्रीडास्थान (याला 'महात्मा' अकबराहि अपवाद नव्हता! बिकानेरचे महाराज पृथ्वीराज यांच्या लावण्यसंपन्न पत्नीवर—किरणमाईवर—अकबरची पापी नजर पडली होती असा इतिहासांत दाखला मिळतो!!); लालकिल्ला म्हणजे जोधपूरचे मानधन महाराज अमरसिंह राठोड यांच्या स्वाभिमानाला डिवचण्यासाठीं सलाबतजंगसारख्या उन्मत्त कोषाध्यक्षाला उत्तेजित करणारा पातकी प्रासाद असंच समीकरण माझ्या मनांत घोळत होतं!

मुसलमानी सत्तेच्या जमान्यांत पूर्णतेला गेलेल्या वास्तुकलेचे व शिल्पकलेचे हे नमुने निरखीत असतांना माझ्या

मनांत असाहि विचार आला, मराठ्यांच्या कारकीर्दीला संगमरवरी दगडावर आपला ठसा उमटविण्याचं कसब जमलं नव्हतं. पण प्रजेच्या हृदयावर चिरंतन प्रभाव पाडील असं असाधारण सामर्थ्य मराठमोळ्या राजवटीला लाभलं होतं! 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी' या संभाजीच्या तोंडीं गडकऱ्यांनीं घातलेल्या उद्गाराची अन्वर्थकता पटविणारं कोठें शिवबा, बाजीरावादि नराधिपतींचं धवल चारित्र्य अन् कोठें भोगलालसेच्या तृप्तीपायीं जन्मदात्याला वा पुत्रांना साखळदंडानं जखडून टाकणाऱ्या मदांध मोंगलांच्या कुटिल कारवाया!

दिवाण–इ–खासच्या भिंतीवर मोंगल बादशहांच्या ऐहिक ऐश्वर्याचं आढ्यतेनं वर्णन करणारे अनेक फारसी 'शेर' कोरून ठेवले आहेत—

" अजी दिल कुशा कसरे आली मुकाम।
सरे अकबराबाद शुद अर्श सा॥ "

( या सुंदर महालाच्या निर्मितीमुळं अकबाराबादचं–आग्र्याचं पूर्वीचं नांव–मस्तक आकाशाला जाऊन भिडेल इतकं उन्नत झालं आहे! )

" बाई रोनक ब रगबत मकां।
नही दह बरूये जमीं आसमाँ॥ "

(आकाशानं यापूर्वीं अशा सुंदर भुवनांनीं शोभायमान झालेली भूमि कधींच पाहिली नव्हती !)

फार्सी लिपी व भाषा जाणणाऱ्या आमच्या वाटाड्यानं त्या काव्यपंक्तींचा अर्थ जेव्हां विशद करून सांगितला तेव्हां मलाहि उर्दूत काव्य रचण्याची स्फूर्ति आली अन् मी तिथल्या तिथं पुढीलप्रमाणं दोन तीन शेर—शेर कसले ? शेरास सव्वाशेरच होते ते— रचले :—

" तबाह् हो जायेगी रौनक दिवालोंकी सभी नादान।
नशा इस सल्तनत् की भी मिटेगी सोच अय इन्सान।
हुआी जो मिट्टीसे पैदा उसीमें खाक वह होगी "।
बगीचों और महलों की न दौलत साथ आयेगी।
भलाई और सचाईपर रियायात् जो दुवा देगी।
वही यादगार दुनियामें हमेशा के लिये होगी ! "

अशाप्रकारें गतकालाच्या कटु स्मृतींनीं लाल किल्ल्याच्या दर्शनाचा आनंद कांहींसा कडवटल्यासारखा झाला असला तरी तेथील प्रेक्षणीय गोष्टी पाहण्यांत मी चुकारपणा करीत होतों किंवा अजीबात पाहण्याचं टाळीत होतों असं मात्र म्हणतां येणार नाहीं. उलट, किल्ला बंद होण्यापूर्वी अकबरी महल, गज्नी गेट, जहाँगीर महल, बावडी, सफेद तख्त, हिन्दु मंदिर, कुर्सी, दर्याई दर्वाजा वगैरेसारखा

तिथला जो जो भाग पाहतां येण्यासारखा होता तो पाहून टाकून आम्ही सूर्यास्ताच्या सुमारास आपल्या बिऱ्हाडीं परतलों.

थंड हवेमुळं म्हणा किंवा अपरिचित स्थळाच्या दर्शनाचा आनंद उपभोगण्यांत मन गढून गेलं असल्यामुळं म्हणा, दिवसभर पायपिटी करतांना आम्हांला परिश्रमांची फारशी जाणीव झाली नव्हती. परंतु संध्याकाळीं महाराष्ट्र मंडळाच्या इमारतींत आम्ही परत आलों तेव्हां सर्वांनाच भरपूर विश्रांतीची आवश्यकता भासूं लागली.

मुंबईहून आमच्या बरोबर आलेले कांहीं शिक्षक रात्रीच्या गाडीनं मथुरेकडे रवाना झाले. बाकीच्यांनीं तिथंच कांहीं तास विश्रांति घेऊन सरळ दिल्ली गांठण्याचा बेत मुकर केला.

इहलोकापासून स्वर्ग कितीहि दूर असला तरी निदान मेल्यावर तरी तो दृष्टीच्या टापूंत येतो असं म्हणतात. पण दिल्लीचं दूरत्व खुद्द आग्र्याला जाऊनहि कमी होऊं नये असा विचित्र अनुभव त्या वर्षीच्या सफरींत मला अन् माझ्या बरोबर असलेल्या सोबत्यांना जणूं यावयाचा होता ! फार काय, खुद्द दिल्ली स्टेशनवर उतरल्यावरहि "दिल्ली तो बहुत नजदीक है" अशी प्रचलित वाक्यांत फिरवाफिरव करण्याची सोय राहूं नये असं दैवानं जणूं आगाऊ ठरवून टाकलं होतं !

म्हणजे त्याचं असं झालं, आग्रा शहर पाहून झाल्यावर आम्ही दिल्लीकडे जाणारी गाडी पकडण्यासाठीं ' राजाकी मंडी ' या स्टेशनवर आलों. मध्यरात्रीचा सुमार होता ! अंगांतलं रक्त गोठून गेल्याचा विलक्षण भास व्हावा अशी भयंकर थंडी पडली होती ! अति झालं म्हणजे हसूं यावं अशी एकंदर मनुष्यस्वभावाची घडण आहे. पण थंडीचा अतिरेक या गोष्टीला अपवाद म्हणून समजावा लागेल ! रूमालीच्या गारठ्यामुळं एकमेकावर आपटणाऱ्या दांतांच्या पंक्तींतून हास्य फुटणं अगदींच अशक्य ! जो तो प्लॅटफॉर्मवर स्वतःभोंवतीं ब्लॅंकेट, शाल किंवा असलंच एखादं ऊबदार पांघरूण घेऊन अंगाचं मुटकुळं करून बसला होता. तोंडसुद्धां उघडं ठेवायची सोय नव्हती ! गोषांतील सुंदर स्त्रियांपेक्षां अलीबाबाच्या गोष्टींतील बुधल्यांत लपून बसलेल्या चोरांशीं एखाद्यानं आमचं साम्य कल्पावं असाच तो एकंदर थाट होता ! बाकी चोरी आणि थंडी यांत विलक्षण साधर्म्य आहे यांत शंका नाहीं ! बोबडी वळणं, दडून बसणं, अंगाचा थरकांप होणं, तोंड लपविणं वगैरे चेष्टितं चोराच्या काय किंवा थंडीनं गारठलेल्याच्या काय, दोघांच्याहि बाबतींत सारख्याच प्रकर्षानं दिसून येत नाहींत काय ? पण मला मुख्यतः सांगायचं तें याहून निराळंच आहे. साडेबारा पाऊणच्या सुमारास स्टेशनवर गाडी येऊन थडकतांच

' कियामत ' च्या दिवशीं ( A day of judgment ) भराभर थडग्यांतून उठून बाहेर येणाऱ्या मृतदेहांप्रमाणं आम्ही सर्वजण आपापलीं आवरणं बाजूस सारून नि हातांत सामान घेऊन ताडकन उभे राहिलों! " संघेशक्तिः कलौयुगे " हें धोरण गाडींत शिरण्याच्या बाबतींत अगदींच निरुपयोगी ठरत असल्यामुळं आमच्यापैकीं प्रत्येकजण निरनिराळ्या डब्याकडे धावला. पण आणखी एका सुभाषिताचं वैयर्थ्य आम्हाला स्वानुभवानं शिकावयाचं होतं ! " ठोठावा म्हणजे उघडेल " ( Knock it, and it will be opened ! ) ही बायबलांतील उक्ति आगगाडीच्या दरवाजाबाबत अगदींच कुचकामी ठरते हेंच खरं ! आम्ही जेवढ्या उत्साहानं दारावर धक्के मारूं लागलों तेवढ्याच तत्परतेनं अन् सावधगिरीनं आंतील बोलट घट्ट बसवले जाऊं लागले. इतक्यांत गाडीनं शिटी फुंकली अन् पाहतां पाहतां दृष्टिआडहिं झाली ! आमच्यापैकीं एकालाहि आंत शिरण्याची संधि मिळाली नव्हती. दोन तासानंतर आणखी एक गाडी येणार असल्याचं आम्हांला कळलं. आतां मात्र काय वाटेल तें झालं तरी ही गाडी चुकूं द्यायची नाहीं असा निर्धार करून आम्ही त्या गाडीची प्रतीक्षा करूं लागलों. प्रयत्नांतीं परमेश्वर मिळवूं, मग पॅसेंजरचीच काय टाप लागली आहे आम्हाला डब्यांत न घ्यायला ! " असा सूक्ष्म अहंकार आमच्यापैकीं प्रत्येकाच्या दृष्टींत तरळत

असावा ! ( दुसरी गाडी येईपर्यंत पुन: सर्वांनीं आपापलीं शरीरं आपादमस्तक पांघरुणांत गुरफटून टाकण्याचा निर्णय घेतल्यामुळं हें अंदाजी बोलणं ! )

दुसरी गाडी आली. शेलारमामांच्या हांकेसरशीं दुप्पट त्वेषानं उदयभानूच्या सैन्यावर तुटून पडणाऱ्या मावळ्यां-प्रमाणं आम्हीं सर्वजण गाडी पुरती थांबण्यापूर्वीच दिसेल-त्या दारावर चवताळून धडक मारूं लागलों !

आमचा प्रयत्न अगदींच वायां गेला नाहीं. आमच्यापैकीं चारपांचजणांना गाडींत कसाबसा शिरकाव करून घेतां आला ! मात्र डब्यांत शिरतांना कोंडाण्यावर लढणाऱ्या मावळ्यांची सहज सुचलेली उपमा पूर्णोपमा असल्याचं कटु सत्य दुसऱ्याच क्षणीं माझ्या ध्यानांत येऊन चुकलं ! चढण्या उतरण्याच्या धांदलींत आमच्यापैकीं एकाजणाची वळकटी बेपत्ता झाली आणि "जागा मिळाली पण वळकटी गेली" या सिंहगडाविषयींच्या ऐतिहासिक उद्गाराच्या चालीवर नवा उद्गार सहजच माझ्या तोंडून बाहेर पडला !

आणि प्लॅटफॉर्मवर उरलेल्या आम्हा पांच सहा प्रवाश्यांना नंतर आलेल्या दोन तीन गाड्यांपैकीं एकींतहि प्रवेश मिळूं शकला नाहीं तेव्हां दिल्ली नुसती दूरच नव्हे तर दिक्कालातीत असावी असाहि संशय माझ्या मनांत बळावूं लागला.

आमच्या आधीं नव्या दिल्ली स्टेशनवर जाऊन आमच्या-साठीं तिथल्या वेटींग रूममध्यें तिष्ठत बसलेल्या एम्. ए. उपाध्ये, वेटे इत्यादि मंडळींनाहि दिल्लीच्या बाबतींत हीच शंका आली असावी. त्या सर्वांना तब्बल बारा तास स्टेशन-वरच ताटकळत काढावे लागले !

किंग्जवेवरील सिंधी निर्वासितांच्या छावणींतील मुलींच्या-हायस्कूलमध्यें आमच्या उतरण्याची सोय केली होती. पाटण्याइतकीच किंबहूना कांकणभर अधिकच दिल्लीकरांनीं प्रतिनिधींच्या निवासाची चोख व्यवस्था ठेवली होती. शाळेच्या प्रशस्त इमारतीच्या प्रांगणांत काळजीपूर्वक जोपासलेली सुंदर फुलबाग, फराळाभोजनासाठीं तात्पुरता मंडप उभारून मांडलेली लहानमोठीं टेबलं व त्यावरल्या पांढऱ्याशुभ्र चादरी, दिल्लीच्या शाही, परंपरागत वाता-वरणाशीं सुसंगत वाटेल अशी नोकराचाकरांच्या चाल-चलणुकींतली ऐट आणि आदब .... या साऱ्या गोष्टी पाहून सर्वांच्याच वृत्ति प्रसन्न झाल्या !

मात्र डालडांत माखून निघालेला सिंधी पद्धतीचा भात, भाकरीसारख्या जाड पोळ्या अन् तसल्याच चमत्कारिक भाज्या खातांना आमची मोठी केविलवाणी अवस्था झाली. एका मराठी कवीनं मालिनी वृत्तांत सांगितलेला उदर-भरणाचा उदात्त अर्थ ध्यानांत असूनहि पुढयांतल्या अन्न-

ब्रह्माच्या वाटेला जाण्याचं साहस आम्हाला होईना. वाढप्यानं ताटांत वाढलेल्या टोमॅटो गाजराच्या फोडी भाताच्या एखाद दुसऱ्या शिताबरोबर किंवा पोळीच्या लहानशा तुकडयाबरोबर खाऊं लागलों. टोमॅटो गाजराचा कंटाळा आला कीं कांदामुळ्याच्या फोडीवर ताव मारूं लागलों. आत्मप्रतीतीवांचून शाब्दिक ज्ञानाच्या अवडंबरावरच समाधान मानूं पाहणाऱ्या पढीक पंडितासारखाच आमचा तो खटाटोप होता.

दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहांटेच प्रातर्विधि व स्नान वगैरे आटोपून आम्ही शिक्षणपरिषदेच्या मंडपाकडे निघालों.

परिषदेचं उद्‌घाटन राष्ट्रपति राजेंद्रबाबूंनीं केलं. त्यांनीं आपल्या भाषणांत प्रचलित शिक्षणपद्धतीसंबंधीं व्यक्त केलेले विचार मोठे मौलिक स्वरूपाचे वाटले. ते म्हणाले,

"....वर्तमान शिक्षाप्रणाली पुरानी है। इससे आधुनिक काल की आवश्यकता की पूर्ति नहीं होती। इसमें परिवर्तन करने के लिये अभीतक जो प्रयास किये गये हैं वे सफल नहीं हुअे। इसका कारण यह है कि आवश्यकतानुसार प्रचुर मात्रामें प्रयत्न नहीं किये गये। हमारी वर्तमान शिक्षाप्रणाली सव्वासौ वर्ष पुरानी है। उस समय जिस उद्देश्य को सामने रखकर यह प्रारंभ की गयी थी, वह अब नहीं रहा, किंतु प्रणाली अभी है। मैं यह नहीं

कहता कि इसमें हेरफेर के प्रयत्न नहीं किये जा रहे। किंतु हमें इन प्रयत्नों में सफलता नहीं मिली। हो सकता है कि जितना प्रयत्न किया जाना चाहिये, वह नहीं किया गया। .... आवश्यकता इस बात की थी कि पहले प्राईमरी शिक्षा में सुधार लाया जाता लेकिन हमने उसका प्रारंभ विश्वविद्यालय शिक्षा से किया। पहले विश्वविद्यालय आयोग नियुक्त किया और फिर माध्यमिक–शिक्षा–आयोग, और अब शायद प्राईमरी शिक्षा आयोग के बारे में विचार किया जा रहा है। .... यदि सुधारकार्य हम प्राईमरी से प्रारंभ करते तो आज विश्वविद्यालयों में पहुंचनेवाले हजारों लडकों को जो स्थान मिलता नहीं दिखाई देता है, वह दिखाई देता। .... आज जितने स्नातक निकलते हैं, व निकम्मे हैं। इसके लिये मैं उनको दोषी नहीं ठहराता, यह तो उनके अध्यापक देख सकते हैं। .... एक जमाना था जबकि शिक्षा का काम इज्जत का काम था। जो लोक उस समय शिक्षा देते थे, चाहे वे मौलवी हों या पंडित, उन्हें इज्जत की दृष्टिसे देखा जाता था। लेकिन आज यह जमाना नहीं है। आज इज्जत सिर्फ पैसेपर निर्भर करती है। अध्यापकों को आज समाज में बहुत कम दर्जा दिया जाता है, उन्हें अपने जीवन के लिये पैसे की आवश्यकता पडती है तो उसके लिये दौडना पडता है। लोग आज अध्यापन की

व्यवसाय की ओर सभी अन्य स्थानों से मायूस होकर आते हैं, इसलिये कि वे इस पेशेमें कुछ स्थायित्व नहीं देखते। हमें इन दोनों चीजों को बदलना है।....”

राष्ट्रपतीप्रमाणेंच हुमायून कबीर यांनीं अध्यक्षपदावरून केलेलं भाषणहि उद्बोधक व विचारांना चालना देणारं वाटलं. त्यांचं भाषण आटोपतांच आम्ही दहाबाराजण शहर पहाण्यासाठीं मंडपाबाहेर पडलों. युनिव्हर्सिटीपासून काश्मीर गेटपर्यंत पायीं चालतच शहराचा कांहीं भाग नजरेखालून घातला. चिरेबंदी दगडाच्या किंवा विटांच्या भव्य पण मोडकळीस आलेल्या कमानी, जुने लाकडी दरवाजे इत्यादि गतकालीन वास्तूचे कांहीं अवशेष सोडल्यास शहराच्या बहुतेक भागावर आधुनिकतेचेच संस्कार झाल्याची साक्ष जागजागीं दिसून येत होती. तथापि जुन्या दिल्लींतील प्राचीन तट, मशिदी व थडगीं ही प्रचंड मजबूत बांधकामं पाहणाऱ्याच्या मनावर चिरंतन स्वरूपाचा ठसा उमटवितील इतकीं वैशिष्ट्य-पूर्ण आहेत यांत शंका नाहीं. लाल किल्ला असो, जामा मशीद असो नाहीं तर कुतुबमिनार असो, सर्व ठिकाणीं भव्यता, कलाकुसर व ऐश्वर्य यांचा मनोहर मिलाफ झालेला पहावयास मिळतो. आग्र्याच्या लाल किल्ल्याप्रमाणं येथील लाल किल्ल्याच्या बांधणींतहि शहाजहाननं आपली विलास-प्रियता नि ऐश्वर्य यांची उधळण केली असली तरी

या दोन्ही किल्ल्यांच्या अंतर्बाह्य रचनेंत व इतर बाबतींत केवढा तरी फरक असलेला दृष्टीस पडतो. एकाच रागांतील दोन चिजा भिन्न प्रकारच्या बांधणीमुळं वेगळ्या वाटाव्यात तसे शहाजहान बादशहाच्या सौंदर्यदृष्टीचे ते दोन वेगवेगळे आविष्कार रसिकांच्या मनाला भुरळ घालीत असतात ! मात्र शहरांतल्या एकापेक्षां एक भव्य अशा मशिदी व थडगीं पहात असतांना सुरवातीला डोळे दिपून जात असले तरी नंतर नंतर मात्र त्यांतील तोच तोपणा कंटाळवाणा वाटूं लागतो. त्यादिवशीं तीन चार मशीदी पाहिल्यानंतर मनाला आलेला शीण घालविण्यासाठीं आम्ही निराळयाच ठिकाणीं–राजघाटावर गेलों ! महात्माजींचं चिरविश्रांतीचं तें पुण्य स्थान !

एखाद्या तीर्थक्षेत्राप्रमाणं प्रस्तुत स्थळाकडे स्त्रीपुरुषांची अहोरात्र रीघ लागलेली असते. महात्माजींच्या वाट्यास आलेलं तें भाग्य कुणालाहि हेवा वाटावं असंच नव्हतं कां ? राजकारणांत एकामागून एक आलेलीं अपयशं, व्यवहार्यतेच्या दृष्टीनें दुबळी ठरलेली तत्त्वप्रणाली, निरपवाद सत्य अहिंसेची कांस धरल्यामुळं राष्ट्रावर ओढवलेल्या भीषण आपत्ति इत्यादि अनेक गोष्टींचीं स्मृति बापूजींच्या स्मरणाबरोबर मनांत उचंबळून येणं अपरिहार्य असलं तरी त्यांच्या समाधीसमोर नतमस्तक होऊन श्रद्धांजलि वाहतां मात्र त्यांच्या जीवितांतल्या साऱ्या त्रुटि, सारीं वैगुण्यं

नेणिवेच्या खोल डोहांत अदृश्य होतात आणि विश्वबंधुत्वाचं स्वप्न साकार करूं पाहणारा, मानवतेचा दिव्य संदेश प्राणिमात्राच्या अंतःकरणापर्यंत नेऊन पोंचविणारा एक महापुरुष येवढीच आदरयुक्त जाणीव मनांत शिल्लक राहते.

पण बापूजींच्या समाधीला वंदन करतांना माझं मन विचलित झालं तें दुसऱ्याच एका विचारामुळं! एखाद्या पुण्यक्षेत्राप्रमाणं बापूजींच्या समाधीभोवतीं असंख्य स्त्री-पुरुषांचा मेळा जमा होतो खरा, पण त्यांच्या उत्तुंग, विशाल विभूतिमत्वानं स्तिमित होऊन श्रद्धायुक्त अंतःकरणानं मस्तक लवविणारे, बापूजींबद्दल विशुद्ध भक्तिभाव बाळगणारे कितीसे भगत आढळून येऊं शकतील? उलट त्यांच्या तत्त्वज्ञानाचं भांडवल करून राजकारणाचा सौदा करणाऱ्या वाणिज्य वृत्तीच्या शिष्यवरांचीच गर्दी झालेली दिसून येत नाहीं का?

अशा प्रकारें विषण्ण विचारांनीं भारावलेल्या मनःस्थितींत मी महात्माजींच्या समाधीला पुनः एकदां वंदन केलं व उद्यानांतून बाहेर पडलों.

त्याच दिवशीं संध्याकाळीं आम्ही सर्वजण भारतीय औद्योगिक प्रदर्शन पाहण्यासाठीं गेलों. अतिशय मोठ्या प्रमाणावर भरविण्यांत आलेलें हें प्रदर्शन या वर्षीच्या

नाताळमध्यें दिल्लीस येणाऱ्या सर्व प्रवाश्यांच्या आकर्षणाचा नि कुतूहलाचा प्रमुख विषय बनलं होतं. सुमारें ऐशीं एकर जागा प्रदर्शनानं व्यापली होती. यावरून त्याच्या विस्तृतपणाची कल्पना करतां येईल. पण विस्ताराप्रमाणंच विविधतेच्या दृष्टीनंहि प्रस्तुत प्रदर्शन अभूतपूर्व होतं यांत शंका नाहीं. जगांतल्या लहान मोठ्या एकवीस देशांनीं या प्रदर्शनांत भाग घेऊन त्याची भव्यता व शोभा वृद्धिंगत केली होती. परीकथेंतील एखाद्या अद्‌भुतरम्य विलासी नगरीप्रमाणं प्रदर्शनाचा थाटमाट दिसत होता. रंगीबेरंगी, चित्रविचित्र विद्युद्दीपांच्या झगझगाटामुळं प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति भांबावून जात. जर्मनी, रशीया वगैरे देशांतील प्रचंड यंत्रं व त्याचं अनाकलनीय चलनवलन पाहतांना तर माझा अक्षरशः अकराव्या अध्यायांतला अर्जुन झाला होता ! कांहीं स्टॉल्स मात्र ज्ञानाप्रमाणंच करमणुकीच्या दृष्टीनंहि संस्मरणीय वाटले. टेलिव्हिजनच्या शोधाचं प्रात्यक्षिक दाखवणारा अमेरिकेचा एक स्टॉल होता. एका लहानशा नमुनेदार प्रेक्षागृहांत पडद्यावर कुठल्याशा नभोवाणीकेंद्रावर चाललेला कार्यक्रम पाहतांना आमची खूपच करमणूक झाली. तसंच एकेठिकाणीं ‘ जादूच्या हाताचं ’ ( Magic Hand ) प्रात्यक्षिकहि प्रेक्षकांच्या वृत्ति क्षणभर स्तिमित करून सोडीत होतं. हा स्टॉलहि अमेरिकेचाच होता. रेडिओ ॲक्टिव्ह पदार्थांना प्रत्यक्ष स्पर्श करणं घातक असल्यामुळं

वैज्ञानिकांना असल्या प्रयोगाच्या वेळीं विशिष्ट युक्तीचा अवलंब करणं आवश्यक असतं. ती युक्ति म्हणजेच त्यांनीं बनविलेला हा जादूचा हात! या हाताचीं बोटं माणसाच्या बोटांप्रमाणंच हवी तशी हालचाल करूं शकतात. या यांत्रिक हाताच्या सहाय्यानं वैज्ञानिकाला दूर बसूनहि हवे ते पदार्थ हाताळतां येतात.

अशाच प्रकारचे आणखी बरेच स्टॉल्स प्रदर्शनांत मांडले होते. पण ते सारेच पहावयाचे म्हटलं असतं तर चार दिवसहि पुरले नसते. आम्हाला एवढी सवड नसल्या-मुळं पर्वणीकालांत तीर्थक्षेत्रावर चटावर श्राद्ध उरकणाऱ्या भटजींच्या धोरणाचा अवलंब करावा लागला.

अणुशक्तीचा विधायक वापर कसा करतां येईल हें दर्शविणारा अमेरिकन पॅव्हेलियन, मानवी शरिराची कांचेची प्रतिकृति बनवून तिच्या द्वारें शरिरांतील स्नायू व मज्जातंतु यांच्या हालचालींची कल्पना आणून देणारा पूर्वजर्मनीचा स्टॉल, कांचेच्या सुंदर वस्तूंचं प्रदर्शन करणारं झेकोस्लाव्हेकियाचं दालन, जलविद्युत्‌शक्तीच्या निर्मितीची कल्पना आणून देणारं आस्ट्रीयाच्या पॅव्हेलियनमधलं मॉडेल (प्रतिकृति) इत्यादीवरून धावती नजर टाकीत आम्ही प्रदर्शनाच्या आवाराबाहेर पडलों.

दुसरे दिवशीं जुन्या दिल्लींतील आणखी कांहीं स्थळं आम्ही पाहून टाकलीं. फिरोजशहा, सिकंदर लोदी,

अनुक्रम 23662 दि. क्रमांक 2370 नों दि.

सफदरजंग इत्यादींचे मकबरे ( स्मारकें ) व कुतुब मसजीद राय पिथौरा कोट, लालकोट इत्यादि स्थानं पाहत असतांना माझ्या मनांत अनेक संमिश्र विचारांचं काहूर माजलं होतं ! एखाद्या हिंदु स्त्रीला जबरदस्तीनं बाटवून तिच्यावर यावनी पेहराव चढवावा तशा या साऱ्या वास्तु दिसत होत्या. मूळच्यां हिंदूंचीं देवळं, तीर्थ इत्यादि नष्टभ्रष्ट करून त्यांच्याच मालमसाल्यावर उभारलेल्या मशीदी नि मकबरे म्हणजे आर्यांच्या वास्तुदेवतेवर बळजबरीनं लादलेली वेशभूषाच नव्हे कां ?

नव्या दिल्लींतील आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज आलेल्या सुंदर इमारती, सरकारी कचेऱ्या, प्रशस्त रस्ते वगैरे गोष्टी पाहतांना मनावरचा ताण कांहींसा कमी होतो न होतो तोंच त्याची प्रसन्नता घालविणाऱ्या तिथंहि कांहीं ' चिजा ' सापडतातच ! शतकानुशतकं दिल्लीकरांच्या हाडींमासीं खिळलेली बेशिस्त, धसमुसळेपणा व अस्वच्छता नव्या दिल्लींतहि आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असतात. फुटपाथवरून चालण्याच्या नियमाची इथं अक्षरशः पायमल्ली होत असलेली दिसून येते, तर वाहनं हाकणाऱ्यांना डावा उजवा हा भेद फारसा पसंत नसल्याचं पावलो-पावलीं जाणवतं ! सायकलवर मागच्या बाजूस पत्नी, पुढं दांडीवर दोन मुलं व सर्वांच्या पुढं भाजीपाल्याचा टोकरा अशा थाटांत एखादा शीख इसम जात

असलेला पाहिला म्हणजे ‘ सरदारजींचं बिऱ्हाड सायकलवर ’ अशी एका जुन्या म्हणीची नवी आवृत्ति काढण्याचा विचार मनांत डोकावून जातो ! क्यू हा काय पदार्थ आहे हेंहि कोणाला फारसं उमगलेलं दिसत नाहीं. पण या साऱ्यापेक्षां उद्वेग वाटत होता तो दिल्लीकरांच्या भोगपरायणतेचा, विलासप्रियतेचा एकेक ढंग पाहतांना ! नव्या दिल्लींतील बहुतेक मोठीं हॉटेलं म्हणजे बाई, बाटली नि जुगार यांचे अड्डेच आहेत म्हणतात. उत्तान, भडक वेषभूषा व केशभूषा करून रस्त्यानं ऐटींत फिरणाऱ्या अँग्लोइंडियन, पंजाबी व क्वचित् इतर प्रांतीय स्त्रिया स्त्रीसुलभ शालीनतेला जितक्या पारख्या झालेल्या दिसतात तितकेच नृत्याच्या नि सिनेमाच्या षौकांत अष्टोप्रहर निमग्न झालेले पुरुषहि पुरुषसुलभ पराक्रमाला वंचित झालेले आढळून येतात !

लालकिल्ला, जामामशीद, फिरोजशहा का कोटला वगैरे कांहीं स्थळं जुन्या दिल्लीचीं वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील, तशीं सेक्रटरीएट, कौन्सिल हॉल, राष्ट्रपति भवन ( पूर्वीचे व्हाईसरिगल लॉज ), इंडिया गेट, बिर्ला मंदिर हीं ठिकाणं नव्या दिल्लीचे विशेष म्हणून उल्लेखितां येतील.

१९१४ च्या महायुद्धांत धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांच्या स्मरणार्थ ‘ इंडिया गेट ’ हा भव्य दरवाजा बांधण्यांत आला असून त्याच्या पायाभरणीचा मुहूर्त ड्युक ऑफ कॅनॉट या इंग्रज अधिकाऱ्यानें केला होता.

नव्या दिल्लीच्या बरोबर मध्यभागीं राष्ट्रपतिभवन बांधण्यांत आलं आहे. प्रस्तुत टोलेजंग आलीशान इमारतीनं नव्या दिल्लीची शोभा शतगुणित केली आहे यांत शंका नाहीं. एडविन ल्युटिन आणि हरबर्ट बेकर या दोन सुप्रसिद्ध पाश्चात्य कारागिरांनीं या इमारतीचा आराखडा आखला होता असं म्हणतात. निरनिराळ्या रंगाच्या संगमरवरी दगडांनीं हा भव्य, उत्तुंग प्रासाद बांधला आहे. एकूण १३० एकर जमीन या भवनानं व सभोवतालच्या रमणीय उद्यानानं व्यापली असून त्याच्या निर्मितीसाठीं एकंदर दीड कोटी रुपये खर्च आला असं सांगण्यांत येतं. राष्ट्रपतिभवनाच्या पिछाडीस असलेली मोगलबाग तर जगांतल्या उत्तमोत्तम उद्यानांपैकीं एक असल्याचं माहितगार सांगत असतात. याच रमणीय वाटिकेंत राजेंद्रबाबूंनीं आम्हा सर्व प्रतिनिधींना अल्पोपहार दिला. बागेंतल्या हिरवळीवर व जलाशयावर निरनिराळे कोन साधून रंगी-बेरंगी प्रकाश झोत टाकण्यांत येत तेव्हां तें दृश्य आगळ्याच अपूर्वाईनं साऱ्यांचा चित्तवेध करी.

राष्ट्रपतिभवनांतील अल्पोपहाराचा कार्यक्रम आटोपल्यावर आम्ही बिर्लामंदिराकडे जाण्यासाठीं टांगे ठरविले.

१९३३ सालीं राजा बलदेवदास बिर्ला या श्रीमान्, दानशूर गृहस्थांनीं लाखों रुपये खर्चून हें मंदिर उभारलं. या मंदिरांत लक्ष्मीनारायण, शंकरपार्वती, भगवान

श्रीकृष्ण, इत्यादि देवदेवतांच्या मूर्ति विराजमान झालेल्या आहेत. भिंतीवर पुराणांतील ठळक प्रसंग व भगवत्‌गीता वेद, उपनिषदं इत्यादि धर्मग्रंथांतील बोधपर वचनं चितारलेलीं दृष्टीस पडतात. मंदिराच्या आवारांतच भगवान बुद्ध व महावीर या धर्मसंस्थापकांचींहि मंदिर बांधलीं आहेत. या मंदिरांतहि त्या त्या धर्मसंस्थापकांच्या जीवनांतले मुख्य मुख्य प्रसंग चित्रित करण्यांत आले आहेत. मंदिराच्या आवारांतच मागच्या बाजूस एक छोटासा कृत्रिम डोंगर, भुयार, कालवा वगैरे तयार केल्यामुळें लहान मुलांच्या करमणुकीची उत्तम सोय झाली आहे.

एक दीड तास मंदिराच्या निरीक्षणांत घालविल्यानंतर आम्ही किंग्जवेवरील कँप विभागांतील आपल्या बिऱ्हाडीं परत आलों. नव्या व जुन्या दिल्लींत आणखी कांहीं ठिकाणं पाहण्यासारखीं राहून गेल्याचं कुणीतरी आमच्या लक्षांत आणून दिलं. पण तिथला मुक्काम वाढवायला आमच्यापैकीं कुणीच तयार नव्हतं. वाहनांच्या गैरसोयी, खाण्यापिण्याची अनवस्था आणि जीव घेणारी थंडी अशा त्रिविध तापांनीं ( थंडी सुद्धां ‘ ताप ’ दायकच अं ! ) पोळलेल्या परस्थांना दिल्लींत अधिक दिवस मुक्काम ठोकण्याची कशी इच्छा होणार ? ‘ झाली एवढी मजा पुरे ! ’ हा जुन्या नाटकांतील सूत्रधाराच्या सूचनेच्या चालीवर उद्‌गार काढून आम्ही त्याच दिवशीं संध्याकाळीं दिल्लीला रामराम ठोकला.

# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास

## [ सफर तिसरी ]

उत्तर हिंदुस्थानांत तिसऱ्यांदा दूरवरची सफर करण्याची मला संधि मिळाली तीं जयपूर इथं भरलेल्या अखिल भारतीय शिक्षणपरिषदेच्या ३१ व्या अधिवेशनानिमित्त.

डिसेंबर महिना उजाडला कीं, चालू वर्षी अधिवेशनाच्या निमित्तानं इतर कोणकोणतीं स्थळं पहावयाचीं, खर्च किती करावयाचा, बरोबर कोणकोण शिक्षक येणार वगैरे गोष्टीसंबंधीं शिक्षणपरिषदेस जाऊं इच्छिणाऱ्या शिक्षकांच्या डोक्यांत विचारचक्रं सुरू होत असतात.

१९५६ मध्यें जयपूर इथं भरणार असलेल्या अधिवेशनाची निश्चित तारीख जाहीर झाली तेव्हां आम्ही कांहीं शिक्षकांनीं एकत्र बसून प्रवासाची योजना आखली.

बडोदा–अहमदाबाद मार्गानं जयपूरला जाण्याचं ठरवून त्या मार्गावर लागणारीं बहुतेक प्रेक्षणीय स्थळं पाहण्याचा बेत आम्ही मनाशीं योजला. बडोदा, अहमदाबाद, अजमेर, जयपूर, या शहरांबरोबरच अबूचा पहाड, सांबर सरोवर, पुष्कर तीर्थ इत्यादि निसर्गरम्य ठिकाणांनाहि भेट द्यावयाचा आमचा विचार असल्यामुळं यंदाची सफर विशेष संस्मरणीय ठरणार असा साहजिकच मी आपल्या मनाशीं कयास बांधला.

२३ डिसेंबर रोजीं रात्रीं साडे आठ वाजतां आम्हीं जनता एक्सप्रेसनं बॉम्बेसेन्ट्रल स्टेशनहून निघालों. अहमदाबादपर्यंत जागेचं रिझर्व्हेशन केलं असल्यामुळं दहाबारा तासांचा प्रवास तरी आरामांत होणार या विचारानं आम्ही निश्चिंतपणें डब्यांत आपापलं सामान लावलं अन् जो तो गप्पागोष्टी, पत्ते, वाचन किंवा निद्रा यांपैकीं कशाना कशांत गढून गेला. मला मात्र प्रवासांत असतांना वरीलपैकीं कोणतंच साधन करमणुकीसाठीं आवश्यक वाटत नाहीं. प्रवास हेंच मनाला विरंगुळा देणारं प्रभावी साधन हाताशीं असल्यावर पुनः अन्य गोष्टीचा आश्रय करूं पाहणं म्हणजे भज्याबरोबर चटणी तोंडीं लावणाऱ्या गुजराथ्यांच्या चालीसारखंच चमत्कारिक समजावं लागेल !

मुशाफिरींत आढळणारीं तऱ्हेतऱ्हेच्या स्वभावाचीं माणसं, दृष्टिपथांत येणारे नवेनवे प्रदेश, स्थलपरत्वें भाषा, पोषाखादि विषयांच्या बाबतींत अनुभवास येणारं रुचिवैचित्र्य हीं सारीं जेवढीं रंजवूं शकतील तितकीं क्वचितच दुसरीं साधनं त्याला आनंदित करूं शकतील.

वृक्षाच्या शीतल छायेखालीं मदिरा, मदिराक्षी अन् कवितेची वही जवळ असल्यानंतर अन्य कोणतीहि गोष्ट आपणाला नको असं उमरखय्याम म्हणून गेला.

आगगाडीच्या प्रवासाचा योग त्याच्या आयुष्यांत आला असता तर निदान प्रवासांत तरी वरील त्रैर्याऐवजीं गाडींतली खिडकीजवळची जागाच त्याच्या काव्यात्मतेला आवाहन करायला समर्थ ठरली असती असा माझा विश्वास आहे ! उमरखय्यामच कशाला ? म्युनिसिपालिटींत जन्ममृत्यूची नोंद करणाऱ्या कारकुनाला सुद्धां प्रवासांतले विविध अनुभव, नाना प्रकारच्या गमती क्षणभर तरी खुलविल्याशिवाय राहणार नाहींत. मात्र ते अनुभव तत्परतेनं टिपून घ्यायला आवश्यक ती विशिष्ट मनोवृत्ति माणसाजवळ असणं, निदान ती प्रयत्नपूर्वक जोपासणं अत्यंत आवश्यक आहे !

स्टेशनवर गाडी थांबतांच उतारूंची चढतांउतरतांना उडणारी झुंबडच पहाना. डब्यांत शिरण्याची किंवा बाहेर पडण्याची प्रत्येक प्रवाशाला सारखीच घाई झालेली असते. पण आपापला 'संकल्प' सिद्धीस नेण्याची प्रत्येकाची तऱ्हा कांहीं और असते! भगवंतांनीं गीतेंत मुमुक्षूसाठीं मोक्षाचे जे चार मार्ग सांगून ठेवले आहेत त्यांचं इथंहि आपणाला प्रत्यंतर मिळतं ! दारांतल्या खेचाखेंचीतून स्वतःची सुटका करून घेणं हा मोक्ष मानला तर त्यासाठीं उतारूंनीं आपापल्या प्रकृतिधर्मानुसार वेगवेगळ्या उपायाचा अवलंब करावा हें स्वाभाविकच म्हटलं पाहिजे.

" भल्या माणसा, थोडी समज घे, बरोबर बाकडं घेऊन जाणार नाहींस कांहीं शेवटीं ! " असा वेदांत सुनवीत डब्यांत घुसणारा प्रवासी ज्ञानयोगी म्हटला पाहिजे. आंतील उतारू नको नको म्हणत असतांहि त्यांच्या प्रतिकाराला न जुमानतां दारांतून बळेंच ट्रंक आणि वळकटी आंत सरकवून त्यावर आसन ठोकून बसणाऱ्याची जात हठयोग्याची समजावी. खिडकींतून प्रथम जोडे, केरसुण्या इत्यादि चिल्लर नग आणि नंतर तंगड्या, पोट वगैरे ठोक नग क्रमाक्रमानं आंत सोडून देतांना, " अहो डोळे फुटले कीं काय तुमचे ? " " मिस्टर ही काय गार्डींत चढण्याची रीत झाली तुमची ? " इत्यादि प्रश्नांना एका शब्दानंहि उत्तर न देतां बाकावरली जागा काबीज करणारा प्राणी कर्मयोगी म्हणून ओळखावा; आणि अर्ज विनंत्या करून हातापाया पडून डब्यांत कसाबसा प्रवेश मिळविणारा इसम भक्तिमार्गाचा पुरस्कर्ता समजावा.

हें सारं सांगण्याचा उद्देश हा कीं मनुष्याला रंजविणाऱ्या शेंकडो गोष्टी प्रवासांत सुसिद्ध असतात, तिकडे आपलं लक्ष जात नाहीं म्हणूनच त्यांतल्या रंजकतेला आपण मुकतो !

मानवी स्वभावाचे अनेकविध बारकावे लक्ष्यांत घेतांना प्रवासांतल्या किरकोळ गैरसोयींची जशी त्याला विस्मृति

होते तशी निसर्गाचीं विविध सौंदर्य न्यहाळतांनाहि त्याला शारीरिक अगर मानसिक श्रमांचा विसर पडतो.

विरार स्टेशन मागं टाकल्यावर आमची गाडी ऐन वेगानं धावूं लागली तेव्हा आकाशांत चमचमणाऱ्या असंख्य तेजोगोलांचा तो भव्य पसारा मी टक लावून किती तरी वेळ पहात राहिलों! निळ्या पार्श्वभूमीवर दृग्गोचर होणारे ते अगणित नक्षत्रांचे पुंजके पाहून कविहृदयच काय पण सामन्यांच्या वृत्तिहि पुलकित व्हाव्या अशा विलक्षण दीप्तीनं ते तळपत होते. एखाद्या अभागी नवकवीलाच आकाशाला गोंवर नाहींतर कांजण्या निघाल्याचा अभद्र आभास झाला असता.

गाडी जेवढ्या वेगानं अंतर कापीत चालली होती तितक्याच वेगानं, अंतराळांतल्या त्या दिव्य दृश्यावरून निरनिराळ्या कवींना सुचलेल्या उपमा उत्प्रेक्षा मला एका पाठोपाठ एक आठवूं लागल्या.

बालकवीला तो मोहक देखावा पाहतांना वाटलं होतं—

“.... आली होती भारती, आतां अस्त समुद्राला
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला !
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती !
आकाशींच्या गंगेला कीं बुद्‌बुद् हे येती ! ”

आणि अशा हृदयंगम कल्पना सुचत असतांनाच—

" विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्या माणकांचा !" अशी भव्य उत्प्रेक्षा त्यांच्या प्रतिभेला स्फुरली होती ! 'कालपथाच्या अतुट उतरणीवरून जगन्नाथाचा रथ धडधडत गेल्यावर मागून नक्षत्रकणांचा जणुं धुरळा उडत आहे' असं भव्योदात्त रूपक स्वातंत्र्यवीर सावरकरांना सुचलं होतं. लाँगफेलोनं कोणत्याशा कवितेंत या दृश्याला उद्देशून—

" ... from that blue tent above
A hero's armour gleams ... "

असा अन्वर्थक उद्गार काढला होता. नक्षत्रमालिकांना उद्देशून निरनिराळ्या कवींना सुचलेल्या एकाहून एक सरस कल्पना मनाशीं आणीत त्या वेधक दृश्यावा नजर खिळवून मी किती वेळ बसलों होतों कुणास ठाऊक ?

मध्यरात्र उलटून गेल्यावर हळूं हळूं डोळ्यांवर निद्रेची झांपड येऊं लागली आणि मी खिडकीशीं रेलून ऐसपैस पाय ताणून दिले.

सकाळच्या गारव्यानं मी जागा झालों त्यावेळीं गाडीनं बडोदा स्टेशन नुकतंच मागं टाकलं असल्याचं मला कळलं. खरं म्हटलं तर आमची गाडी उजाडतां उजाडतां अहमदाबादला पोंचणार होती. पण वाटेंत दोन तीन ठिकाणीं

निरनिराळ्या कारणांनीं खोळंबा झाल्यामुळं अपेक्षेपेक्षां पुष्कळच उशीरां आम्ही अहमदाबादेस पोंचलों.

तिथं माउंट आबूकडे जाणारी मिटरगेज गाडी दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर तयार होतीच. गाडीचा छोटासा आकार आणि उतारूंची प्रचंड भीड यांचा कसा काय मेळ जमावा हें एक कोडंच होतं. साम, दाम, दंड, भेद ही एका काळची नृपनीति सत्यअहिंसेच्या या युगांत राज्यकर्त्यांऐवजीं रेल्वे-उतारूंच्याच विशेष उपयोगी पडण्याजोगी असली तरी यावेळीं तिचा आम्हाला उपयोग होईलसं वाटत नव्हतं! कुठल्याहि नीतिनियमांच्या पालनासाठीं राज्यकारभारांत प्रथम सुव्यवस्था असणं आवश्यक असतं. पण जिथं मुळांतच अराजक निर्माण झालेलं असतं तिथं नियम तरी कोणता लावणार अन् त्याचा उपयोग तरी काय होणार?

अहमदाबाद स्टेशनवर उभ्या असलेल्या त्या लहानशा गाडीला अन् प्लॅटफॉर्मला एकाद्या अंदाधुंदी माजलेल्या निर्नायक राज्यासारखीच अवकळा आली होती. रेल्वे-पोलिसाच्या एका डब्यांत कसाबसा प्रवेश मिळवून आम्ही उभ्यानेंच माउंट अबूरोडपर्यंत प्रवास केला आणि संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारांस अबूच्या पहाडावर जाणारी बस पकडली.

काळ्याभोर, डांबरी रस्त्यावरून क्षणाक्षणाला लहान-मोठीं वळणं घेत आमची बस पहाडाची चढण चढूं लागली त्यावेळीं मला सरळ, स्वभावोक्तीचा आश्रय न करतां वक्रोक्तीच्या सहाय्यानं अर्थाभिव्यक्तींत चमत्कृति उत्पन्न करणाऱ्या माघ कवीचीच सारखी आठवण होत होती. रस्त्याच्या कधीं डाव्या बाजूस तर कधीं उजव्या बाजूस दृष्टिपथांत येणारा डोंगराचा उतार व त्यावरील हिरवीगार वृक्षराजी, रानटी फुलांनीं डवरलेलीं झुडुपं आणि मधूनमधून लक्षवेध करणाऱ्या प्रस्तरराशी पाहतांना प्रवासानं आलेला सारा शिणभाग नाहींसा होत होता. सर्व चढण संपल्यावर डोंगराच्या सपाटीवरून बस धांवू लागली तेव्हां आजूबाजूच्या धर्मशाळा, राजामहाराजांनीं स्वतःसाठीं बांधून ठेवलेलीं निवासस्थानं आणि बागा, देवालयांचीं शिखरं वगैरे गोष्टी पाहतांना मन अधिकच प्रसन्न झालं !

समुद्रसपाटीपासून सुमारे चार हजार फूट उंचीवर असलेल्या अबूची सुशीतल हवा प्रवाश्यांना जितकी उत्साहदायी वाटते तितकीच तिथली रम्य वनश्री, त्यांतून डोकावणारी विरळ विरळ वस्ती, निरुंद पण स्वच्छ रस्ते मनुष्याच्या प्रसन्नतेंत भर टाकीत असतात.

संपूर्णानंद स्वामींच्या देखरेखखालीं चालणाऱ्या एका धर्मशाळेंत आम्ही बिऱ्हाड ठेवलं. प्रशस्त खोली, वीज,

नळ, अंघोळीस गरम पाणी इत्यादि सर्व सुखसोयी असूनहि दिवसाकांठीं माणशीं फक्त चार आणेच भाडें पडत असे. इतकी स्वस्ताई हल्लींच्या दिवसांत क्वचित्‌च आढळून येते. आम्ही उतरलों होतों त्या धर्मशाळेंत जेवणाचीहि सोय होती. अवघ्या दहा आण्यांत भात, भाजी, आमटी नि चपात्या असं महाराष्ट्रीय पद्धतीचं जेवण आम्हाला मिळणार हें ऐकून सानंद आश्चर्य वाटलं आम्हाला. दोन वर्षांपूर्वी पाटण्यास गेलों होतों तेव्हां असंच स्वस्तांत सुग्रास जेवण मिळालं होतं. पण त्या प्रदेशांत भुईमुगाच्या किंवा तिळाच्या गोड्या तेलाऐवजीं राईचं उग्र तेल वापरण्याची प्रथा असल्यामुळं जेवतांना थोडा विरसच होत होता आमचा.

स्वयंपाक तयार होईपर्यंत अबूचा सुप्रसिद्ध ‘सनसेट् पॉइंट’ पाहून येण्याच्या विचारानं आम्ही कांहींजण धर्मशाळे-बाहेर पडलों. सूर्यास्तास अवघीं वीस पंचवीस मिनिटंच अवधी उरला होता. आणि तें ठिकाण धर्मशाळेपासून एक दीड मैल असल्याचं आम्हाला कळलं तेव्हां अक्षरशः धावतच आम्ही तिकडे जावयास निघालों.

अबूला जाणाऱ्या साऱ्याच प्रवाश्यांनीं तिथल्या सूर्यास्ताच्या देखाव्यासंबंधीं पुष्कळच ऐकलेलं असल्यामुळं त्यांच्या मनांत त्याविषयीं विलक्षण कुतूहल उत्पन्न झालेलं

असतं. आम्ही सन्सेट पॉईंटवर जाऊन पोहोंचलों तेव्हां जवळजवळ दीडदोन हजार माणसं तें स्वर्गीय दृश्य पाहण्यासाठीं तिथं जमलेलीं आम्हाला आढळून आलीं! सूर्यास्ताला आतां अवघी पांचचे मिनिटं उरलीं होतीं. पण तेवढ्या अल्पावकाशांत त्या दिव्य, अलौकिक दृश्याचा माझ्या स्मृतीवर असा काहीं ठसा उमटला कीं वर्षानुवर्षांनंतरहि तो पुसला जाणार नाहीं अशी माझी खात्री आहे! यापूर्वी माथेरानचा सनसेट पॉइंट मी दोनतीन वेळां पाहिला होता. पण अबूच्या मानानं त्या देखाव्याची आकर्षकता कांहींच नव्हे असं माझं मन ग्वाही देऊं लागलं. तिथल्या दृश्यांत कांहीं अपूर्व विशेष असल्याचा आम्हा सर्वांना प्रत्यय आला. थेट मावळतीपर्यंत पसरलेला विस्तीर्ण भूप्रदेश एकाद्या भव्य विषयाला उठाव मिळावा म्हणून चित्रकारानं चातुर्यानं चित्रित केलेल्या पार्श्वभागासारखा विलोभनीय वाटत होता. मावळण्याच्या पंथाला लागलेलं आरक्त सूर्यबिंब अन् क्षितिजावर पसरलेली रक्तिमा—भगवान विष्णूनं घेतलेलं मोहिनीचं रूपच जणूं संध्येच्या मिषानं प्रकट झालं होतं. आणि तें रक्तवर्ण कांतिमान् रविबिंब तिच्या कटीवरील अमृतकुंभाची आठवण करून देत होतं. खरोखर मी मंत्रमुग्ध, अवाक् स्थितींत तें अपूर्व दृश्य न्यहाळण्यांत किती घटका घालविल्या असल्या कुणास ठाऊक! पण इतक्यांत सूर्यास्त झाला आणि

क्षणापूर्वी विविध रंगछटांनीं सुशोभित झालेलं पश्चिम क्षितिज हळूंहळूं काळवंडूं लागलं. रंगभूमीवरला नाट्यप्रयोग संपल्यानंतर, अंधाराचा पडदाच जणूं हळूंहळूं खालीं येत होता.

दुसरे दिवशीं सकाळींच आम्हीं प्रातर्विधि आटोपून धर्मशाळेबाहेर पडलों. मार्कर नांवाचा एक सडपातळ बांध्याचा उंच किडकिडीत इसम वाटाड्या म्हणून आम्हीं आमच्याबरोबर घेतला होता. अबूच्या पहाडावर आम्हीं ज्या कांहीं संस्मरणीय गोष्टी पाहिल्या त्यांतच मार्करचीहि गणना करावी लागेल. माझ्या स्मृतिपटलावर उमटलेला मार्करच्या कष्टाळू, प्रामाणिक, हंसतमुख, व्यक्तित्वाचा ठसा कधींहि पुसला जाणार नाहीं अशी माझी खात्री आहे. पोटासाठीं हजार लांड्यालबाड्या, नाना सोंगढोंग वठविणाऱ्या मतलबी संधिसाधूंनीं हल्लींचं जग बुजबुजलं आहे. त्यांत मार्करसारखी एखादी 'विसंवादी' व्यक्ति आढळांत आली म्हणजे तो अनुभव विशेष अपूर्वाईचा वाटूं लागतो! अवघे बारा तासच मार्कर आमच्या सहवासांत होता. पण तेवढ्या अवधींत त्याच्या सेवातत्पर, मनमिळाऊ, प्रामाणिक व शांत वृत्तीची आम्हा साऱ्यांच्या अंतःकरणावर अशी कांहीं छाप पडली व आम्हाला त्याच्याविषयीं अशी कांहीं आत्मीयता वाटूं लागली कीं

जन्मजन्मांतरीचा हा कुणी ऋणानुबंधींच आपणास भेटला आहे असं आम्हाला वाटूं लागलं! "भाव स्थिराणि जननान्तर सौहृदानि" हा उद्गार कविकुलगुरू कालिदासाला स्फुरायला. असाच एकादा अनुभव कारणीभूत झाला नसेल का ?

मार्करनं बहुतेक सर्व प्रेक्षणीय स्थळं त्यादिवशीं आम्हाला दाखविलीं. नख्खी, तलाव, टोडरॉक, रामकुंड, अर्बुदादेवी, वसिष्ठाश्रम, अचलगढ, भर्तृहरिगुंफा, मन्दाकिनी कुंड, भृगु आश्रम, दिगम्बर जैनमंदिर वगैरे ठिकाणं दाखवितांना पायाला भिंगरी बांधल्याप्रमाणं मार्कर सारखा धावत होता आणि आम्ही रेंगाळत, फरफटत कसे तरी त्यांच्यातलं नि आमच्यातलं अंतर वाढूं न देण्याची शिकस्त करीत होतों. द्रुत लयींत तराणा गाणाऱ्या एखाद्या पट्टीच्या गवयाची साथ करतांना मामुली बजवैय्याला सम गांठतां गांठतां मुष्किल व्हावं तशीच आमची गत झाली !

बाकी अबूचा परिसर पायाखालून घालतांना आमच्या शरिराला कितीहि शीण आला असला तरी मनाला मात्र प्रत्येक नव्या स्थळाच्या दर्शनानं अननुभूत आनंदाची प्रतीति येत होती !

जैनांचा प्रथम तीर्थंकर आदिनाथ व हिन्दूंच्या निरनिराळ्या देवता यांच्या अधिवासानं पावन झालेल्या

या पुण्यभूमीवरून फिरतांना एकीकडे मनाला उदात्तेचा स्पर्श होत होता तर तिथल्या प्राकृतिक सौंदर्याच्या दर्शनानं भौतिक सुखाचीहि जोड त्याला लाभत होती.

विशेषतः दिलवाड्याचीं जैन मंदिरं व त्यांतील संगमरवरी कलाकुसर पाहतांना विस्मय, आनंद, कुतूहल इत्यादि संमिश्र भावनांनीं आमचीं मनं भारावून गेलीं.

आमच्या राहत्या निवासस्थानापासून सुमारें दोन अडीच मैलावर दिलवाडा हें लहानसं गांव होतं. तिथंचं या विश्वविख्यात, रमणीय वास्तूची उभारणी झाली आहे. अकराव्या शतकांत होऊन गेलेला राजा भीमदेवाचा मंत्री विमलशाह व त्याचे दोन बंधु–वस्तुपाल व तेजपाल यांनीं या मंदिरांची निर्मिति केली असा इतिहासांत पुरावा मिळतो. एकूण पांच मंदिरं बांधण्यांत आलीं आहेत. पण त्यापैकीं दोन मंदिरांचं स्थापत्य विशेष नजरेंत भरण्यासारखं आहे. विमलशहानं बांधलेल्या ‘ जिनालय ’ या मंदिरावर जो अलोट पैसा खर्च झाला त्याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं या मंदिरासाठीं योजलेली जागा जितक्या सुवर्णमुद्रांनीं आच्छादली जाणं शक्य होती तितक्या तिच्यावर अंथरण्यांत आल्या व मग त्या सर्वांचा विनियोग तें मंदिर उभारण्याकडे केला गेला. अठरा कोटी रुपये या कामीं खर्चीं पडले असं म्हणतात.

मंदिराच्या उभारीवर झालेला हा प्रचंड व्यय असाधारण तर खराच, पण त्याच्या दुग्धधवल दगडादगडांतून जी अभूतपूर्व, विलक्षण कलात्मकता आविर्भूत झाली होती, जी अप्रतिम कलाकुसर ठिकठिकाणीं प्रकट झाली होती ती त्याहूनहि असामान्य म्हटली पाहिजे. मंदिराच्या भिंती, छत, स्तंभ, उंबरवठे इत्यादि साऱ्यांतून शिल्पकलेचा मोठा मनोरम अनविष्कार झालेला दिसून येत होता. विशेषतः छताच्या खालच्या बाजूनं जागजागीं नक्षीकामाचे जे अनेकविध नमुने कोरलेले होते ते पहात असतांना आम्ही थक्कच होऊन गेलों. माणसांच्या आकृति असोत कीं पशु, पक्षी, फुलं इत्यादि गोष्टी असोत, संगमरवरांतून त्या साकार करतांना कलावंतानीं आपली सारी कलात्मकता पणाला लावल्याचा प्रत्यय येत होता. एखाद्या स्वरूपसुंदर मुग्ध नर्तकीच्या पदविन्यासाची आकृति पाहत असतांना तिच्या कलेंतील लय अन् तालबद्धता यांचीहि प्रचीति येत असल्याचा मधुर आभास आम्हाला होई, तसा एखाद्या अर्धोन्मीलित पुष्पकलिकेची आकृति निरखीत असतांना तिच्या सौंदर्याबरोबरच नाजुकपणा अन् मंद सौरभहि अनुभवाला येत असल्याचा विलक्षण संभ्रम होई ! मुख्य मंदिरांतील जैनांचे तीर्थंकर श्री आदिनाथ स्वामी यांची मूर्ति अतिशय भव्य व आकर्षक वाटली. मूर्तीच्या डोळ्यांत अस्सल हिऱ्याचे खडे जडवले होते, त्यामुळं त्यांची

तेजस्विता प्रत्येकाचा लक्ष्यवेध करीत होती. तसंच या मूर्तीच्या कंठांतील खऱ्या हिऱ्यामाणकांचा हारहि तिची शोभा द्विगुणित करीत होता. या मंदिरासमोरच अठ्ठेचाळीस खांबांचा एक मोठा सभामंडप आहे. या सभामंडपाच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी सव्वीस याप्रमाणें एकूण बावन छोटीं छोटीं दालनं असून प्रत्येकांत जैनांच्या एकेका तीर्थंकरांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यांत आली आहे.

या मंदिरापासून थोड्याच अंतरावर नैऋत्येस अंबिका देवीचें देऊळ आहे. हें मंदिर आदिनाथाच्याहि मंदिरापूर्वी बांधलें असावें असा तर्क आहे. यांतील आंबिकादेवीची मूर्ति आदिनाथाच्या मूर्तिप्रमाणेंच विशाल व सुंदर आहे. मंदिराच्या प्रवेशदारानजिकच असलेल्या एका दालनांत हत्तीच्या दहा संगमरवरी प्रतिमा असून प्रवेशद्वारांतील विमलशहाचा अश्वारूढ पुतळा सर्वांचं लक्ष प्रथम आपणाकडे वेधून घेतो. हाहि संगमरवरी दगडांतूनच कोरून काढला आहे. पूर्वी दालनांतील प्रत्येक हत्तीवर जिनेश्वर भगवानाची मूर्ति विराजमान झाली होती असं सांगतात. पण हल्लीं त्या सर्व तिथून दुसरीकडे हलविण्यांत आल्या आहेत.

भारतांतील हिंदूंचीं अनेक देवस्थानं, विद्यापीठं नि लेण्या उध्वस्त करून मुसलमानांनीं आपल्या असहिष्णु,

विध्वंसक वृत्तीची साक्ष जागजागीं अमर करून ठेवली. याला अबूच्या पहाडावरलं स्थापत्यहि अपवाद राहिलं नाहीं! अंबिका देवालयाचा बराचसा भाग मुसलमानांनीं नष्ट, भ्रष्ट करून टाकला होता. पुढें चौदाव्या शतकांत लल्ल आणि बीजड नांवाच्या दोन धनसंपन्न गृहस्थांनीं या देवस्थानाचा जीर्णोद्धार केला असं कर्नल टॉडनं रजपुतांच्या इतिहासांत नमूद करून ठेवलं आहे. जैन-मंदिर पाहिल्यानंतर सरळ बिऱ्हाडाकडेच जाण्याचा आम्हीं निश्चय केला. सकाळपासून चालून चालून पाय आतां खूपच दमले होते. भुकाहि सपाटून लागल्या होत्या. शिवाय त्याच दिवशीं संध्याकाळीं आम्हाला आपला मुक्काम हलवायचा असल्यामुळें जेवणानंतर थोडी विश्रांति घेणं आवश्यक वाटूं लागलं होतं. मार्कर मात्र अजूनहि उरलीं सुरलीं स्थळं पाहण्याविषयीं आम्हाला आग्रह करीत होता. प्रभुरामचंद्राच्या भात्याप्रमाणंच त्याच्या छातीचा भाताहि अक्षय्य होता कीं काय कुणास ठाऊक? थकवा कसा तो त्याला ठाऊकच नव्हता! श्रीरघुनाथजीका मंदिर, 'रामकुंड', 'अनादरा गेट', 'देव आङ्गन' 'सूर्य मंदिर', 'पालनपुर पॉइंट', 'लख-चौऱ्यासी', 'अग्निकुंड', 'व्यासतीर्थ', 'गौतम आश्रम', इत्यादि अनेक स्थळं प्रेक्षणीय असल्याचं तो सांगत होता. पण वेळ अन् उरक या दोन्हींच्या अभावामुळें उत्कट इच्छा

असूनहि आम्हाला मार्करच्या आग्रहाला नकार द्यावा लागला.

संध्याकाळीं साडेपांच वाजतां आम्ही अबूच्या पहाडाला निरोप देऊन बसनं अबूरोड स्टेशनवर येऊन दाखल झालों.

रात्रीं दहाच्या सुमारास अहमदाबादेहून येणाऱ्या गाडीनं आम्ही जयपूरकडे प्रयाण करणार होतों. गाडींत जागा मिळण्याचा प्रश्न परवांप्रमाणं आजहि आम्हाला भेडसावीत होता. पण या बाबतींत मार्करनं आम्हाला खूपच सहकार्य देऊं केलं होतं. तो आम्हाला गाडींत जागा मिळवून देण्यासाठीं मुद्दाम आमच्याबरोबर स्टेशनपर्यंत आला होता. स्टेशनवरील एका ओळखीच्या रेल्वेअधिकाऱ्याच्या मदतीनं त्यानं आम्हाला एका डब्यांत पुरेशी जागा मिळवून दिली.

जयपूरला आमची गाडीं पोहोंचली तेव्हां दुपारचे अकरा वाजून गेले होते. एका सरकारी हायस्कूलच्या जुन्या इमारतींत शिक्षणपरिषदेच्या कार्यवाहांनीं आमची उतरण्याची सोय केली होती. शिष्टाचाराची भाषा म्हणूनच 'सोय' म्हणायची येवढंच. तसं पाहतां तिथं साऱ्याच गोष्टींच्या बाबतींत आमची गैरसोय होती. सामान बंदोबस्तांत ठेवतां येईल अशी कडीकुलूप असलेली खोली नव्हती, पाण्याची व्यवस्था नीट नव्हती,

शाळेच्या इमारतींचं दुरुस्तीचं काम चालूं असल्यामुळं स्नानगृहंहि तात्पुरतीं बंदच ठेवण्यांत आलेलीं होतीं. त्यामुळं उतरण्यासाठीं दुसरी चांगली जागा मिळाली तर पहावी म्हणून आमच्यापैकीं कांहीं शिक्षक जागेचा शोध करण्यासाठीं शहरांत गेले.

दोन अडीच तास शहरांत पायपिटी केल्यानंतर त्यांच्या प्रयत्नाला यश आलं. शहराच्या मध्यवस्तींत आणि परिषदेच्या मंडपापासून थोड्याच अंतरावर असलेल्या जैन श्वेतांबर धर्मशाळेंत सात आठ खोल्या मिळाल्याची बातमी ऐकतांच आमच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. नव्या जागेंतील खोल्या ताब्यांत घेऊन सामानसुमान व्यवस्थितपणें लावीपर्यंत संध्याकाळ झाली होती. या गडबडींत परिषदेच्या उद्घाटनाच्या प्रसंगीचं व अध्यक्षीय भाषण आम्हाला ऐकावयास मिळूं शकलं नाहीं. पण याला कुणाचाच इलाज नव्हता. दोन तीन दिवस प्रवासाच्यावेळीं अंगावर असलेले कपडे बदलल्याशिवाय व स्वच्छ अंघोळ केल्याशिवाय सभेला जाऊन बसण्याची कल्पनाच आम्हाला कशीशी वाटूं लागली.

संध्याकाळीं दिवेलागणीनंतर आम्ही शहरांत फेरफटका मारून येण्याच्या इराद्यानें बाहेर पडलों. पहावं तिकडे कावेच्या रंगाच्या लालभडक इमारती आणि सरळ लांबच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



लांब रस्ते हें प्रथम दर्शनींच डोळ्यांत भरण्यासारखं जयपूरचं वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. निरुंद रस्ते किंवा वेड्या वाकड्या गल्ल्या या शहरांत शोधूनहि सापडतील किंवा नाहीं याची शंकाच वाटली आम्हाला. मात्र शहराच्या रेखीवपणाच्या नि सुडौल रचनेच्या मानानं स्वच्छता मात्र अभावानंच दिसून येत होती तिथं. नाकी डोळीं नीटस असलेल्या नि निकोप बांध्याच्या एखाद्या युवतीच्या अंगावर, मलीन गलिच्छ वस्त्रं असावींत त्याप्रमाणं त्या शहराचं सौंदर्य मला भासलं. नगरींतल्या अस्वच्छते-बरोबरच तेथील लोकांचं दारिद्र्य नि अज्ञानहि तिथल्या वातावरणाची उदासीनता वाढवीत असल्याचं मला दिसून आलं. मोंगल राजवटीच्या छायेखालीं नांदणाऱ्या वस्ती-सारखा जयपूरचा एकंदर थाटमाट मला वाटला. आज एकंदर जगच आर्थिक मंदीनं होरपळून निघालं असल्यामुळं ती आंच या शहरालाहि लागावी यांत कांहींच नवल नव्हतं. आर्थिक विपन्नतेमुळं प्रस्तुत नगरीला आलेली अवकळा क्षणभर दृष्टीआड केली आणि कल्पनेच्या सहाय्यानं तिच्या गतकालीन वैभवाचं नि मोहकतेचं चित्र मनश्चक्षूंसमोर आणलं तर मन प्रसन्न झाल्यावाचून रहात नाहीं.

इ. स. १७२८ मध्यें दुसऱ्या सवाई जगसिंगानं या शहराचा आराखडा निश्चित करून पहिली कोनशीला बसविली. प्रशस्त, रुंद रस्ते, जागजागीं मनोरे, चौक,

बागा, पाणीपुरवठा, सभोंवतालची निसर्गशोभा या सर्व सोयींच्या नि सुखसमृद्धीच्या दृष्टींनीं जयपूरची बरोबरी करणारं दुसरं कोणतंहि शहर हिन्दुस्थानांत नाहीं असं म्हटलं जातं. ' हिंदुस्थानचं पॅरिस ' म्हणून त्याचा केला जाणारा गौरव उचितच वाटला मला.

पण मला या शहराचा सर्वांत कोणता मनोवेधक विशेष वाटला असेल तर तो शहराच्या मध्यभागीं असलेला चंद्रमहाल पॅलेस. तसं पाहिलं तर खुद्द शहरांत आणि शहराच्या बाहेर कितीतरी लहानमोठे राजवाडे गेल्या अडीच तीन शतकांच्या कालावधींत निरनिराळ्या राजा-महाराजांनीं आपापल्या कारकिर्दींत बांधून ठेवले आहेत. राजपूतकालीन वैभवाची अन् स्थापत्यांची घवघवीत साक्ष देणारे या शहरांतले नि शहराबाहेरचे राजाप्रासाद पाहतांना मन आनंदानं उचंबळून येतं. निरनिराळ्या रंगांच्या संगमरवरी दगडांतून कारागिरांनीं निर्माण केलेलं हें अपूर्व कलाविश्व कांहीं घटका तरी माणसाला देहभान हरपायला लावून विशुद्ध, उच्चतर आनंदाचा अनुभव आणून देतं यांत शंका नाहीं. शहरांतील चंद्रमहाल पॅलेस काय किंवा शहरापासून थोड्या अंतरावर असलेले अंबेर येथील मानसिंगादिकांचे उत्तुंग प्रासाद काय पाहत असतांना असल्या निर्मळ कलानंदाचा आस्वाद मनसोक्त-पणें मला घेतां आला. त्यावेळीं मला त्या ऐश्वर्यवंतांच्या

परधार्जिण्या, श्रवृत्तीविषयींचा विषाद जाणवला नाहीं, प्रजेच्या सुखदुःखाची तमा न करतां सुरा आणि सुंदरी, शराब आणि इष्क यांत मश्गुल झालेल्या त्यांच्या भोग-परायणतेची चीड मनांत उद्भवली नाहीं, त्या सत्ताधीशांचे ऐश्वर्योपभोगाचे चोचले पुरविण्याच्या निमित्तानं संगमरवरांतून जो अद्वितीय कलाविलास जन्माला आला, जी अतुलनीय कलाचातुरी प्रकट झाली तिच्या दर्शनाचा शुद्ध, सात्त्विक आनंद तेवढा त्यावेळीं माझं मन अनुभवीत होतं !

जयपूर ते अंबेर यांच्या दरम्यान मानसागर नावाचा एक विस्तीर्ण जलाशय आहे. त्याच्या मध्यभागीं महाराजा प्रतापसिंगानं अठराव्या शतकांत बांधलेला जलमहाल आजच्या घटकेलाहि सुस्थितींत आहे असं म्हणतात. पण तो पहावयास परवानगी नसल्यामुळं आम्ही तिकडे गेलों नाहीं.

अंबेर येथील प्रासाद पाहून आम्ही जयपुरला परतलों तेव्हां माझ्या अंतश्चक्षूंसमोर पुनःपुनः तिथल्या स्थापत्याचे विविध नमुने तरळूं लागले. सुरजपोळ व चांदपोळ, दिवाण–इ–आम, गणेशपोळ, सोहाग मंदिर, दिवाण–इ–खास, सुखमंदिर, जगत् शिरोमणीचं मंदिर, कालिमातेचं मंदिर वगैरे बांधकामाच्या शिल्पसौंदर्यानं माझ्या मनावर टाकलेली मोहिनी दीर्घकालपर्यंत रेंगाळत होती. अंबेरच्या राजवाड्यापासून दीड दोन मैलावर राजघराण्यांतील

स्त्रीपुरुषांचीं स्मारकं बांधलीं आहेत. इथंहि संगमरवरी शिल्पकलेचे तऱ्हेतऱ्हेचे बारकावे पहावयास मिळतात. पंचकोनी, षट्कोनी, अष्टकोनी, वर्तुळाकार अशा विविध आकारांच्या छत्र्या पाहतांना भूमितीशास्त्रांतील एकेक प्रमेय उलगडून दाखविणाऱ्या संगमरवरी आकृतिच आपण पहात आहोंत कीं काय असा भास झाल्यावांचून रहात नाहीं !

शहरांतील चंद्रमहाल राजवाड्यानजीक असलेली वेधशाळाहि चिरकाल स्मरणांत राहील अशी वैशिष्ट्यपूर्ण वाटली मला. दिल्लीतील जंतरमंतर या नांवानं ओळखली जाणारी वेधशाळा नुसती नांवालाच शिल्लक राहिली आहे. पण जयपूरची वेधशाळा नुसती सुस्थितींतच नव्हे तर खगोलशास्त्राच्या अभ्यासकांकडून प्रत्यक्ष उपयोगांतहि आणली जात असल्याचं दिसून आलं. महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना ग्रहांच्या हालचालींचं प्रात्यक्षिक दाखवण्याच्या बाबतींतहि या वेधशाळेचं सहाय्य घेतलं जातं असं आम्हाला कळलं. ध्रुवयंत्र, राजयंत्र, क्रांतियंत्र भित्तियंत्र, चक्रयंत्र, वगैरे पंधरावीस लहानमोठ्या यंत्रांच्या सहाय्यानं पृथ्वीचं परिभ्रमण, ग्रहांच्या गति, ग्रहणं, उत्तरायण दक्षिणायन इत्यादि विषयांचा सूक्ष्म अभ्यास करण्यासाठीं भारतांतील मोठमोठे ग्रहज्योतिषी इथं येऊन कित्येक महिने वास्तव्य करतात असाहि एक उल्लेख माझ्या वाचनांत

आला होता. ग्रहांचा अचुक वेध घेणाऱ्या या यंत्रांचा शोध ज्या संशोधकांनीं लावला त्यांच्या कल्पकतेचं कौतुक करावं तेवढं थोडंच होणार आहे. खुद्द माधवसिंग नांवाच्या राजघराण्यांतील एका पुरुषानं या वेधशाळेंत बरंच लक्ष घालून, स्वतः कांहीं यंत्रांचा शोध लावून तीं अद्ययावत् करण्याचा प्रयत्न केला असं म्हणतात.

वेधशाळा पाहून झाल्यानंतर जयपूरमधलीं आणखी कांहीं प्रेक्षणीय स्थळं पाहाण्याच्या इराद्यानं आम्ही रिक्षा ठरवल्या व शहरांत फिरू लागलों. गोविंदजीचं मंदिर, हवामहाल, ईश्वरलाठ, रामनिवास बाग, म्युझियम इत्यादि ठिकाणं विशेष नजरेंत भरलीं. संध्याकाळच्या सुमारास रमत गमत बाजारविभागांतहि एक फेरफटका मारला. पण मुंबई पुण्याच्या मानानं इथलीं दुकानं फारशीं आकर्षक वाटलीं नाहींत. हस्तिदंतापासून बनविलेल्या व नक्षीकाम केलेल्या सुबक वस्तु निरनिराळ्या घाटाच्या सुरया, नि मातीचीं व लांकडी खेळणीं मात्र बरींच स्वस्त मिळूं शकतात. अशाच एका कलाकौशल्याच्या वस्तूंच्या दुकानांत मी व कांहीं शिक्षक शिरलों तेव्हां तेथें विक्रीसाठीं ठेवलेल्या मेंढपाळाच्या हस्तीदंती चित्रानं माझं लक्ष आपणाकडे वेधून घेतलं. पांचपन्नास चित्रांतून मी त्याच चित्राची कां खरेदी करावी याचा माझ्या स्नेह्यांना उलगडा

होईना. चांदण्यांत गुजगोष्टी करणाऱ्या प्रेमी युगुलापासून तों अद्वैताचा पुरस्कार करणाऱ्या शंकराचार्यापर्यंत अनेक प्रकारच्या सुरेख तसबिरी त्या दुकानांत मांडून ठेवल्या होत्या. पण त्यांपैकीं मेंढ्या चारणाऱ्या धनगराचंच चित्र मला विशेष कां आवडवं हें माझं मला तरी कुठं नीट कळलं होतं? पण हा प्रश्नच मुळीं अप्रस्तुत होता! एखाद्या कलाकृतीवर मनुष्य लुब्ध होतो तो काय तिचा विशिष्ट विषय लक्षांत घेऊन? छेः छेः त्या विषयाची मांडणी प्रमाणबद्ध, सुसंगत, आकर्षक आहे कीं नाहीं या प्रश्नांच्या अनुरोधानंच तो त्या कलाकृतीच्या सौंदर्याचं मूल्यमापन करीत नाहीं का? पण येवढी शास्त्रीय चिकित्सा माझ्या त्या मित्रांना पटली असती कीं नाहीं कुणास ठाऊक? शिवाय तात्त्विक चर्चा करायला ती वेळहि अनुकूल नव्हती. म्हणून मी गमतीनं माझ्या स्नेह्यांना म्हणालो, "हें पहा, आपल्या शिक्षकीच्या पेशाचं इतकं उत्तम प्रतीक दुसऱ्या कोणत्या चित्रांत व्यक्त होऊं शकेल?"

मेंढपाळाच्या चित्राबरोबर हस्तीदंती अत्तराची कुपी, मुलीसाठीं हस्तीदंती इयररिंग्ज, कृत्रिम वेलदोडे, बदाम, सुपारीचीं खांडं इत्यादि वस्तु खरेदी करून आम्ही बिऱ्हाडीं परतलों.

दिल्लींत जसा शिक्षणपरिषदेसाठीं आलेल्या सर्व प्रतिनिधींना राष्ट्रपतिभवनांत थाटाचा अल्पोपहार देण्यांत

आला होता. तसाच जयपुरच्या प्रशासकांकडूनहि परिषदे-साठीं आलेल्या पाहुण्यांना शाही खाना देण्यांत आला. त्यावेळीं गायत्रीदेवी कॉलेजच्या विस्तीर्ण क्रीडांगणाच्या हिरवळीवर, बँडच्या तालासुरावर सरकारी पाहुणचार स्वीकारतांना शिकवणीच्या ठिगळानं जीवनवस्त्राचं आयुष्य वाढवीत बसणाऱ्या आम्हा गुरुमाउलींना क्षणभर कां होईना पण भरजरी महावस्त्र अर्पण केल्यागत आनंद वाटला असल्यास नवल नाहीं !

उणेपुरे चार दिवस जयपुरांत घालविल्यानंतर दि. २९ रोजीं रात्रीच्या गाडीनं आम्ही अजमेरकडे प्रयाण केलं. मुंबईस पोंचण्यापूर्वी अजमेर, पुष्कर तीर्थ, अहमदाबाद आणि बडोदा अशीं चार ठिकाणं पहाण्याचा आमचा बेत होता.

जयपूरहून निघाल्यानंतर दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही अजमेरला जाऊन पोहोंचलों. स्टेशनजवळच्याच एका खानावळींत बिऱ्हाड ठेवून पुष्कर तीर्थाला जाण्यासाठीं मोटारी ठरविल्या. अजमेरपासून सात मैल अंतरावर हें पुराणप्रसिद्ध क्षेत्र वसलेलं आहे. अजमेर ते पुष्करपर्यंत पक्की सीमेंटची सडक असून दुतर्फा वृक्षांच्या रांगा असल्यामुळं प्रवास करतांना आल्हाद वाटतो. हिरव्यागार वनश्रीमुळं खुलून दिसणारे आजूबाजूचे डोंगर मुशाफिरांच्या प्रसन्नतेंत अधिकच भर घालतात. खुद्द पुष्करचा परिसर आम्हाला अतिव रमणीय नि चित्ताकर्षक वाटला. एका

विशाल जलाशयाच्या कांठावर असलेलीं अनेक देव-देवतांचीं मंदिरं व जलाशयाच्या दुसऱ्या कांठाशीं असलेल्या उत्तुंग पर्वतराजी ऐहिकतेंत गुरफटलेल्या जिवांना क्षणभर कां होईना पण 'परतत्त्वाचा' स्पर्श घडविल्याविना राहणार नाहींत अशी निश्चिती वाटते. म्हणूनच—

"ॐ स्वच्छचंद्रावदातं करिकर मकर-क्षोभ-संजात-फेनम्।
ब्रह्मोद्‌गीत प्रसक्तैर्व्रतनियमरतैः सेवितं विप्र–मुख्यैः ॥
ॐ कारालंकृतेन त्रिभुवनगुरुणा ब्रह्मणा दृष्टिपूतम्।
संभोगाभोगरम्यं जलमशुभहरं पौष्करं मा पुनातु" ॥

या शब्दांत कोणत्याशा कवीनं या तीर्थराजाचा यथार्थ गौरव केला आहे. प्रस्तुत तीर्थाच्या कांठावर लहानमोठे एकंदर बावन्न घाट बांधले आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं खि. पंचमजॉर्ज आपल्या पत्नीसह इथं आले होते तेव्हां त्यांनीं खास स्त्रियासाठीं एक घाट बांधण्यासाठीं देणगी दिली होती. 'झनाना मेरी घाट' या नांवानं सदरहू घाट ओळखला जातो. पुष्करतीर्थाच्या आसपास एकूण चारशें मंदिरं आहेत असं आम्हाला कळलं. पण त्यापैकीं ब्रह्मा-मंदिर, वैकुंठमंदिर, अटपटेश्वर देवालय वगैरे चारसहा मंदिरंच विशेष प्रसिद्ध आहेत. मुख्य मुख्य मंदिरांतील देवदेवताचं दर्शन घेऊन आम्ही अजमेरला दुपारीं तीनच्या सुमारास परतलों. खुद्द अजमेर शहरांत बघण्यासारखं विशेष

अनुक्रम

असं कांहीं नाहीं. शहराला लागून असलेला एक विस्तीर्ण तलाव, सार्वजनिक बाग, जैनाचं मंदिर, अडीच दिवसाची झोपडी, ( अढई दिन की झोपडी ) मुसलमानांचा एक दर्गा व अशींच आणखी एक दोन ठिकाणं पाहिल्यानंतर आम्ही अजमेरला रामराम ठोकला.

अजमेरच्या संदर्भांत चिरकाल लक्षांत राहील अशी एकच गोष्ट आम्हा सर्वांना आढळून आली. ती म्हटली म्हणजे सहासात तास आमच्या सहवासांत असलेला लालचंद नावाचा ड्रायव्हर. मूळ अलाहाबादकडे राहणारा पण धंद्याच्या निमित्तानं अजमेरला बरींच वर्षें स्थायिक झालेला लालचंद अनेक स्वभाववैशिष्ट्यामुळं आमच्या सदैव ध्यानांत राहील. गाडी आणि गप्पा यापैकीं कोणत्या गोष्टीवर त्याचं अधिक प्रभुत्व होतं हें सांगणं कठिण आहे. एखाद्या वळणावर तो जितक्या सफाईनं गाडी काबूत ठेवून झरकन वळवी तितक्याच कुशलतेनं तो एका विषयावरून दुसऱ्या विषयावर जाई. एका काळीं अत्तराचे दिवे जाळणाऱ्या पण आज इलेक्ट्रिक कंपनीचीं बीलं भरायची पंचाईत पडलेल्या संस्थानिकांपासून तो शाळामास्तरांच्या अज्ञाना-पर्यंत आणि दारूबंदीपासून तों शहरांतल्या मोकाट मुलींपर्यंत वाटेल त्या विषयावर त्याच्या जिभेचा पट्टा चालू

राही. त्याच्या निडर 'वक्तृत्वाला' साजेलशीच थोराड, भव्य देहयष्टि त्याला निसर्गानं बहाल केली होती. त्याच्या भरदार मिशा, मिस्किल बुद्धिमत्तेनं चमकणारे डोळे आणि गौर वर्ण पाहतांना मी मनाशी म्हणत होतों, 'हा माणूस चुकून मोटार ड्रायव्हर झाला! खरं म्हणजे लष्करांत एखादा अधिकारी किंवा अशाच एखाद्या हुद्यावर असायला हवा होता हा!'

ड्रायव्हरच्या धंद्यांत मुरलेल्या माणसांचं एकंदर बोलणंचालणं बेछूट असतं, हें मी पहात आलों होतों पण लालचंदच्या वागण्यांतला अन् बोलण्यांतला निर्भयपणा 'त्या' जातीचा नव्हता. त्यांत एक प्रकारचा रूबाब होता, तहजीब अन् आदब या गुणांचं मिश्रण होतं. आपल्या फटकळ बोलण्यानं तो आम्हाला हंसवीं, पण त्यांत नुसता फटकळपणाच नव्हता; समयोचितपणा, मिस्किलपणा अन् हजरजबाबीपणा हें वाक्चातुर्याला उठाव आणणारे गुणहि त्याच्या ठिकाणीं वसल्याचा आम्हाला अनेकवेळां अनुभव येऊन चुकला होता. जीवनाचा कडवटपणा अन् माधुर्य खूपखूप चाखलेल्या एखाद्या वयोवृद्धाची समज अन् चतुरस्रता त्याच्या ठिकाणीं दिसून येत होती. तसं पाहिलं तर त्याचं वय अवघं चाळीशीच्या आंतच होतं. त्याच्या धिप्पाड शरिराकडे पाहून हें खरं वाटत नव्हतं पण वस्तुस्थिति तशी होती. त्याच्या सहवासांत

अनुक्रम क्रमांक ... नों. दि.

आमच्या पार्थिव शरिरांनीं कांहीं मैलांच्या परिसरांतच परिभ्रमण केलं असेल, पण आमच्या मनांना मात्र त्याच्या-बरोबर अनुभूतींच्या केवढ्या तरी अमर्याद विश्वांत अनिर्बंध संचार करतां आला होता. त्या उमद्या, दिलदार माणसाच्या सहवासांत अनुभवलेले मधुर क्षण स्मृति-संपुटांत साठवीत आम्ही अजमेर शहर सोडलं व दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजतां अहमदाबादला आलों.

मुंबईप्रमाणंच या शहरालाहि हल्लीं बकाली स्वरूप येत चालल्याचं दिसून आलं. एलीसब्रीज, कांकरिया तलाव, एका मशिदीचा हलता मिनार, गीतामंदिर, सार्वजनिक बाग वगैरे ठिकाणं पाहिल्यावर आम्ही त्या शहरांत रात्रभर विश्रांति घेतली व दुसरे दिवशीं संध्याकाळीं बडोद्यास येऊन दाखल झालों.

संस्थानी राजवटीच्या ऐश्वर्याची झांक अद्यापहि या नगरीवर रेंगाळत असल्याचं पदोपदीं आम्हाला जाणवत होतं.

सयाजीमंदिर, कामाटीबाग, लक्ष्मीविलास पॅलेस, खंडेराव मार्केट, सूरसागर इत्यादि स्थळं दीर्घकाळ स्मरणांत राहण्यासारखीं वाटलीं. सयाजीराव महाराजांचा राजवाडा भव्यतेच्या, रचनेच्या किंवा ऐश्वर्याच्या दृष्टीनं आम्हाला फारसा डोळ्यांत भरण्यासारखा वाटला नाहीं. कदाचित्

जयपूरचे अवाढव्य नि वैभवसंपन्न प्रासाद नुकतेच आमच्या पाहण्यांत आलेले असल्यामुळं त्यांच्या तुलनेनं लक्ष्मी-पॅलेसचं वैभव आम्हाला कमी वाटलं असेल. मात्र त्या राजवाड्यांतील एका प्रशस्त दालनांतील चारी भिंतींवर सयाजीरावांनीं आपल्या कारकिर्दीत राजा रविवर्म्याकडून रंगवून घेतलेलीं चित्रं दीर्घकाल आठवणींत राहतील इतकीं वैशिष्ट्यपूर्ण वाटलीं. सयाजीराव महाराजांच्या त्या निवासस्थानांतून बाहेर पडतांना माझ्या मनांत सहज विचार आला, 'जयपूर जोधपूरकडल्या राजवाड्यांच्या मानानं सयाजीरावांचा राजवाडा कदाचित् लहान अन् कमी ऐश्वर्यसंपन्न असेल, जयपूरच्या प्रासादासारखा लक्ष्मीपॅलेसला पांढराशुभ्र संगमरवरी दगड मिळाला नसेल, पण स्फटिक-धवल, निष्कलंक चारित्र्यामुळं सयाजीरावांच्या कारकिर्दीला जी शोभा आली तिच्या शतांशानं तरी मानसिंगादिकां-सारख्या भोगपरायण, स्वाभिमानशून्य राजांच्या कर्तृत्वाला येणं शक्य आहे का?'

त्या दिवशीं संध्याकाळीं बाजारपेठेंतून एक फेरफटका मारल्यावर आम्हीं बिऱ्हाडी परत आलों आणि त्याच-दिवशीं रात्रीच्या गाडीनं मुंबईकडे निघालों.

**समाप्त.**

जा. क्र. १०१८६

REFBK 0010196

REFBK-0010196